RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com · Vidabh Kesari News · 90969 45629 · @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

२४ मंगळवार मार्च २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २९७

✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## कोरोना काळाप्रमाणे संयम ठेवा : पंतप्रधान

■ पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज प्रथमच संसदेत भूमिका मांडली. 'व्यावसायिक जहाजांवर होणारे हल्ले आणि होर्मुज सामुद्रधुनीचा मार्ग रोखला जाणे अमान्य आहे,' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. 'या संकटाचा प्रभाव दीर्घकाळ टिकण्याची चिन्हे असून कोरोना महासाथीच्या काळाप्रमाणे आता या संकटाचा धैर्याने, संयमाने आणि शांततेत मुकाबला करायचा आहे,' असे आवाहन त्यांनी केले. या संकटाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा सुरक्षेसाठी केंद्र सरकारचे प्रयत्न सुरू असून पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यात येईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. पंतप्रधान मोदींनी या अनुषंगाने लोकसभेत सविस्तर निवेदन सादर केले.

## दगडखाणींवर विशेष चौकशी पथक; बावनकुळे

**▸विदर्भ केसरी। मुंबई :** राज्यातील दगडखाणीत सुरु असलेले अवैध उत्खन्न थांबवावे लागेल. गौण खानिज क्षेत्रात सुरु असलेल्या उत्खन्नाचा तीन महिन्यात ईटीएसद्वारे (इलेक्ट्रॉनिक ट्रान्झिट सिस्टीम) मागील पाच वर्षाचे सर्वेक्षण केले जाईल. या सर्वेक्षणानंतर अवैध उत्खन्न करणाऱ्यांवर दंड तसेच फैाजदारी गुन्हे दाखल केले जातील. त्यासाठी एक विशेष चौकशी पथक स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. भिवंडी येथील पिळंझे खुर्द गावाजवळ जेएमडी इंटरप्राईजेस या कंपनीने हजारो ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खन्न केले. या कंपनीला दहा कोटी रुपयांचा स्वामीत्व धन आणि दंड वसुलीचा आदेश देण्यात आला आहे. अशा प्रकारे या तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खन्न मोठया प्रमाणात केले जात आहे. या अवैध उत्खन्नाने राज्य सरकारच्या महसूलाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान होत आहे. ठाणे, रायगड, पालघर जिल्हयात असे अनेक अवैध दगडखाणी व स्टोन क्रशर आहेत. अशी लक्षवेधी सुनिल प्रभू यांनी मांडली. दिलीप लांडे, राजू खरे, नाना पटोले, संजय मेश्राम या आमदारांनी या लक्षवेधीवर उपप्रश्न विचारले. ठाणे, पालघर, रायगड, नवी मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर येथील गौण खनिज क्षेत्रातील दगडखाणी व स्टोन क्रशर परवानगीपेक्षा जास्त पोखरत असल्याची वस्तुस्थिती आहे. दगडखाणी, स्टोन क्रशर यांच्यासाठी जमिन मालक, प्रदुषण नियंत्रण मंडळ, स्फोटके वापर अशा अनेक परवानग्या घ्याव्या लागतात. ईटीएस तंत्रज्ञानाने वैध दगडखाणींनी किती उत्खन्न केले आहे, ते कळणार आहे.

# अधिकारी, मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

## सरकार दोषींना सोडणार नाही; मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही

**▸विदर्भ केसरी। मुंबई**



भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण सोमवारी विधिमंडळात वादळी ठरले. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन देतानाच, ज्याचा या प्रकरणाशी संबंध असेल त्याला सोडले जाणार नाही, असे सांगत, मंगळवारी यावर निवेदन करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या प्रकरणात बडे अधिकारी आणि मंत्र्यांचे नाव असल्याचा दावा करत विरोधकांनी विधानसभेत सरकारला धारेवर धरले. याला उत्तर देताना फडणवीस बोलत होते.

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार म्हणाले, लोकांची दिशाभूल करणाऱ्या अशोक खरातचे १०० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आले आहेत. अशा भोंदूबाबांमुळे महाराष्ट्राच्या प्रतिमेला तडा जात आहे. या बाबाने महिलांचे शोषण केले आहे. या खरातवर कारवाई होऊ नये, म्हणून एका हॉटेलमध्ये तीन उच्चपदस्थ अधिकारी बैठक घेत होते, ही माहिती धक्कादायक आहे. महसूल आणि पोलिस अधिकारी देखील खरातची अटक होऊ नये प्रयत्न करत होते. त्यामुळे या प्रकरणात भोंदूबाबासह त्याला आश्रय देणारे अधिकारी आणि मंत्र्यांवर देखील कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी या प्रकरणावर नियम १०१ अंतर्गत विशेष चर्चेची मागणी लावून धरली. विधवा, गर्भवती आणि लहान मुलींचे शोषण होणे हे महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळिमा फासणारे आहे. ज्यांचे फोटो या बाबासोबत आहेत, त्यांनी तत्काळ राजीनामा दिला पाहिजे, असे पटोले यांनी सुनावले. तर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात अशा बुवांचे प्रस्थ वाढतेच कसे? नेत्यांना त्यांच्या पाया पडताना लाजा वाटत नाहीत का?' असा सवाल भास्कर जाधव यांनी उपस्थित केला. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हा विषय राजकारणाचा नसून महिलांच्या सन्मानाचा आहे. महिलांचे 'ब्रेन वॉशिंग' करून त्यांचे शोषण केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी गोपनीय पद्धतीने ट्रॅप लावून ही कारवाई केली असून, पीडित महिलांना धीर देऊन त्यांच्या तक्रारी नोंदवल्या जात आहेत. काही महिलांनी तक्रारी केल्या आहेत. अजूनही काही महिला तक्रारी देतील.

### 'क्लीन चीटचा प्रश्नच नाही'

■ आरोपींच्या क्लीन चीटबाबत विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर मुख्यमंत्री म्हणाले, मी कोणालाही उगाच क्लीन चीट देत नाही. जो पूर्णतः क्लीन असतो, त्यालाच क्लीन चीट मिळते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता उद्या मी सखोल निवेदन करेन,' असे आश्वासन त्यांनी दिले.

■ प्रकल्पग्रस्त पुनर्वसनात विलंब : विखे पाटील राज्यातील विविध धरण आणि सिंचन प्रकल्पांमुळे जमीन गमावलेल्या प्रकल्पग्रस्तांची परिस्थिती बिकट असून, अनेक ठिकाणी पुनर्वसन आणि मोबदला वेळेवर मिळत नसल्याची कबुली जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानसभेत दिली. या प्रश्नावर सर्व प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक घेणार असल्याचेही त्यांनी यावेळी जाहीर केले.विधानसभेत उत्तम जानकर यांनी निरा-देवधर आणि गुंजवणी धरणाच्या कालव्यांच्या कामाबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती.

# राष्ट्रहित विकणे हीच पंतप्रधान मोदींची देशभक्ती आहे का ?

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा संघाला सवाल

**▸विदर्भ केसरी। नागपूर**

उपराजधानीत एकिकडे रखरखते उन तर दुसरीकडे तापलेले राजकीय वातावरण. अशा तप्त वातावरणात वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस यांच्या संयुक्त विशाल जनआक्रोश मोर्चाने सोमवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालयावर धडक दिली. मात्र झिरो माईल चौकात मोर्चा रोखल्यावर भव्य सभा झाली.

या सभेत 'एपस्टीन फाईल्स'मध्ये पंतप्रधानांचे नाव आल्यामुळे अमेरिकेसोबत भारताने केलेल्या कराराने देश आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या गुलाम होईल, असा दावा करीत आता संघाची देशभक्ती कुठे गेली, असा सवाल वंचित आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला. सोमवारी सकाळी नऊ वाजतापासूनच विदर्भाच्या कानाकोपऱ्यातून वंचित आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी उपराजधानीतील संविधान चौक गाठला. आंदोलकांची गर्दी वाढत गेली तसा पोलिसांचा ताफाही वाढू लागला. आंदोलकांनी केंद्र सरकार आणि



संघाच्या विचारसरणीविरुद्ध विरोधात जोरदार घोषणाबाजी केली

? 'देशाला नको आहे, एपस्टीन फाईल्सवाला पंतप्रधान' अशा घोषणांनी संविधान चौक परिसर यावेळी दणाणून गेला. या मोर्चाचे नेतृत्व ॲड. प्रकाश आंबेडकर आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. संविधान चौकात प्रत्येक कार्यकर्त्याच्या हातात केंद्र सरकार आणि संघाचा निषेध करणारे फलक होते. यावेळी मंचावर आमदार विकास ठाकरे, आमदार साजीद खान पठाण, वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर, अंजली आंबेडकर, सीपीआयचे सुभाष लांडे, जम्मू आनंद, आयटकचे महासचिव श्याम काळे, हर्षवर्धन फुंडकर, माजी मंत्री अनिस अहमद, काँग्रेसचे राज्य सरचिटणीस सुरेश भोयर, अतुल कोटेचा, विशाल मुत्तेमवार, अतुल कोटेचा, कुशल मेश्राम, मंगेश वानखेडे, तक्षशीला वाघधरे, नगरसेवक वसीम खान उपस्थित होते. संविधान चौकातील सभेनंतर संघ मुख्यालयाच्या दिशेने मोर्चाने कूच केले. मात्र हजारोंच्या संख्येत निघालेला हा मोर्चा पोलिसांनी आदिवासी शहीद गोवारी पूल, झिरो माईल चौकातच अडवला. त्यामुळे पुन्हा या मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला होता.मोर्चात कम्युनिस्ट पक्ष, आम आदमी पार्टी, आझाद समाज पार्टीचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. चार वाजेपर्यंत मोर्चा झीरो माईल परिसरात होता. पोलिसांनी जणू हजारो आंदोलकांना वेढा घातला होता, असे चित्र होते. राष्ट्रगीतानंतर मोर्चा शांत झाला. विचारधारेची लढाई सुरूच राहील ॲड. आंबेडकर म्हणाले, आमची आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारेची लढाई सुरूच राहणार आहे. परंतु आरएसएस आणि मोहन भागवत यांना विचारायचे आहे, पंतप्रधानांनी केलेल्या करारामुळे राष्ट्राचे हित धोक्यात आले आहे, राष्ट्रहित विकणे हीच पंतप्रधान नरेंद्र मोदींची देशभक्ती आहे का?, देश गुलाम झाल्यानंतर भावी पिढीला काय उत्तर द्याल, असा सवाल करीत आगामी काळात देशभर आंदोलन केल्यानंतर दिल्लीत हे आंदोलन केले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. अमेरिकेचा डाव अमेरिका आपल्या देशातील सार्वजनिक क्षेत्र संपवून खासगीकरणाची मागणी करत आहे. हा अमेरिकेचा डाव आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या तालावर पाऊले टाकत आहेत. अमेरिकेने परदेशात निर्यात होणाऱ्या भारतीय उत्पादनांवर १८ टक्के आयात शुल्क लादले आहे. याचा अर्थ भारतीय उत्पादने अधिक महाग होतील. जिथे वस्तू स्वस्त दरात उपलब्ध असतील, तिथून देश त्या खरेदी करतील. परकीय चलनावर याचा परिणाम होईल. हे एकप्रकारे देशाला आर्थिक गुलाम बनवण्याचे षडयंत्र आहे, असा अरोप संविधान चौकात आंदोलकांना संबोधित करताना ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केला.

### भाजपाचा कर्ता करविता संघ सपकाळ

**मोर्चाला संबोधित करताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, आम्ही देशाचे संविधान व तिरंगा झेंडा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला देणार होतो. पण सरसंघचालक मोहन भागवत हे मोर्चाला व संविधानाला घाबरून दिल्लीला निघून गेले. भाजपा व संघाला देशातून संविधान संपवून बंच ऑफ थॉट लादायचे आहे. संघ व भाजपाला संविधान मान्य नाही. सर्व यंत्रणा सरकारने खिशात घातल्या आहेत. भाजपा व संघाला मनुवादी, हुकूमशाही व्यवस्था आणायची आहे. हा देश अदानी-अंबानीसारख्या भांडवलवाद्यांच्या हातात द्यायचा डाव आहे, असेही सपकाळ म्हणाले.**

दैनिक विदर्भ केसरी · विदर्भाचा मानबिंदू · मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)

'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

⏭ पात्रता आणि आवश्यकता:

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.

**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

■ शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर

■ आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.

■ एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.

इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:

कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.

संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९



# 'दत्ताभाऊ' विलीन

**▸विदर्भ केसरी।**

रामकृष्ण अण्णा सातव पाटील यां विदर्भाच्या राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्त्व, शिक्षण, सहकार महर्षी आणि गोरगरिबांचे आधारस्तंभ लोकनेते दत्ताजी मेघे यांचे रविवारी (ता. २२) रात्री साडेआठच्या सुमारास नागपूर येथे निधन झाले. सोमवारी (ता. २३) मूळगाव पवनार येथील शेतात त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देण्यासाठी पवनारमध्ये जनसागर उसळला होता. 'दत्ताभाऊ' म्हणून सर्वपरिचित असलेल्या मेघे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यापूर्वी त्यांना हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून पोलिसांनी मानवंदना दिली. यावेळी उपस्थित असलेल्या हजारो कार्यकर्त्यांना आणि समर्थकांना आपले अश्रू अनावर झाले होते. 'दत्ताभाऊ अमर रहे' अशा घोषणांनी संपूर्ण पवनार परिसर दुमदुमून गेला होता. या अंत्यविधीला राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री आशीष जयस्वाल यांच्यासह विविध पक्षांचे नेते आणि मंत्र्यांनी दत्ताजी मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व अन्य मान्यवरांनी दत्ताजी मेघे यांच्या पत्नी शालिनीताई, पुत्र सागर मेघे व आमदार समीर मेघे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

दत्ताजी मेघे यांचे नागपूर येथील निवासस्थानी निधन झाले. तेथून त्यांचे पार्थिव सोमवारी (ता. २३) दुपारी दोन वाजताच्या सुमारास सावंगी येथील त्यांच्या निवासस्थानी वर्धेकरांच्या अंत्यदर्शनाकरिता ठेवण्यात आले. सुमारे दोन तास पार्थिव त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आले. यावेळी वर्धेकर आणि संपूर्ण जिल्ह्यातील त्यांचे कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिकांनी या लोकनेत्याचे अंत्यदर्शन घेतले. त्यांनी स्थापन केलेल्या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची यावेळी चांगलीच गर्दी झाली होती. सावंगीतून एका सजवलेल्या वाहनातून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली.



दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू
मंगळवार, २४ मार्च २०२६ | २

# अंजनगावात भोंदूगिरीचा अघोरी खेळ ?

## ‘काळ्या हाऊस’वरील तंत्र-मंत्राच्या चर्चांनी खळबळ

**विदर्भ केसरी। प्रेमदास तायडे**





अंजनगाव सुर्जी परिसरात सध्या एका स्वयंघोषित ‘गुरुजी’च्या नावाने भोंदूगिरी, तंत्र-मंत्र आणि अघोरी कृत्यांच्या चर्चांनी नागरिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. राज्यभर गाजत असलेल्या भोंदू बाबांच्या प्रकरणांनंतर आता अंजनगावातही अशाच प्रकारच्या हालचाली होत असल्याच्या चर्चा जोर धरू लागल्या आहेत. माहितीनुसार, अंजनगावपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर एका विनामंजूर लेआउटमध्ये उभारण्यात आलेल्या आलिशान ‘काळ्या हाऊस’मध्ये रात्रीच्या वेळी गुप्त पूजाअर्चा, तंत्र-मंत्र आणि अघोरी विधी होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या ठिकाणी उद्योगपती, राजकारणी, तसेच काही शासकीय अधिकारी येत असल्याच्या चर्चा नागरिकांमध्ये रंगल्या आहेत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ‘गुरुजी’ आपल्या भक्तांना भविष्यवाणी सांगून विविध पूजा करण्यास भाग पाडतात आणि त्यातून मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ मिळवत आहेत. अंगावर सोन्याचे दागिने परिधान करून भक्तांमध्ये भीती आणि अंधश्रद्धा निर्माण केली जात असल्याचा आरोपही काहींनी केला आहे. विशेष म्हणजे, काही नागरिकांनी रात्रीच्या वेळी प्राण्यांची बळी देऊन होम-हवन केल्याच्या तसेच निर्जन ठिकाणी अघोरी कृत्ये केल्याच्या चर्चाही केल्या आहेत. मात्र या सर्व बाबी अधिकृतरीत्या सिद्ध झालेल्या नाहीत. संत गाडगेबाबांच्या विचारांची भूमी असलेल्या अंजनगाव परिसरात अशा अंधश्रद्धेच्या प्रकारांना खतपाणी मिळत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. जनजागृती करणाऱ्या संतांच्या शिकवणीला हरताळ फासणाऱ्या या घटनांबाबत प्रशासनाने तातडीने चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, संबंधित ‘गुरुजी’विरोधात अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत कारवाई होणार का? त्यांच्या मालमत्तेची चौकशी होणार का? तसेच त्यांच्या संपर्कातील प्रभावशाली व्यक्तींवरही तपासाची झळ बसणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. अंजनगावातील या कथित प्रकारांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने सत्य समोर आणून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## अग्रलेख

# पाय खोलात!

स्वयंघोषित भोंदूबाबा अशोक खरात याच्यावरील नव्या आरोपांमुळे पाथर्डीत संतापाची लाट उसळली आहे. खरातसोबत जमिनीचा व्यवहार केल्यानंतर आपला मुलगा बेपत्ता झाला असल्याचा दावा एका स्थानिक शेतक-याने केला आहे. खरातवर आधीच लैंगिक शोषण आणि जादुटोण्याच्या (अघोरी विद्या) प्रयोगांचे अनेक आरोप असून त्याची चौकशी सुरू आहे त्यातच या नव्या तक्रारीमुळे तपासाची तीव्रता अधिक वाढली आहे. नाशिकच्या पाथर्डी परिसरातील शिवाजी ढगे या शेतक-याने आरोप केला आहे की, त्यांनी खरातला आपली जमीन विकली आणि नेमक्या त्याच दिवसापासून त्यांचा मुलगा बेपत्ता आहे. ढगे म्हणाले की, आपल्या मुलावर नेमका काय प्रभाव टाकला गेला हे आपल्याला माहिती नाही मात्र जमिनीचा व्यवहार आणि मुलाचे बेपत्ता होणे या दोन्ही घटना एकाच वेळी घडल्याचा त्यांचा दावा आहे. त्यांनी खरातवर असाही आरोप केला आहे की, त्यांनी अनेक शेतक-यांकडून पूर्ण पैसे न देता त्यांच्या जमिनी हडप केल्या आहेत. स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, खरातने आपल्या सर्व जमिनींना कुंपण घातले असून तो फक्त अमावस्या आणि पौर्णिमा या विशिष्ट दिवशीच तिथे भेट देत असे. या भेटीदरम्यान दीपक लोंढे नावाचा एक एजंट अनेकदा त्यांच्या सोबत दिसायचा. ग्रामस्थांच्या आरोपांचे स्वरूप अत्यंत गंभीर असल्यामुळे खरातभोवती तपासाचा फास आणखी आवळला जाण्याची शक्यता आहे. कारण या प्रकरणाच्या सर्व अंगांनी सखोल चौकशी करण्यासाठी प्रशासनावर मोठा दबाव वाढत आहे. अशोक खरात आणि त्यांचा कार्यालयीन सहकारी नीरज जाधव यांची समोरासमोर चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान माहिती लपवण्यावरून दोघांमध्ये पोलिसांसमोरच शाब्दिक चकमक उडाल्याचे समजते. तपासादरम्यान आणखी एक महत्त्वाचा दुवा समोर आला आहे. नीरज जाधव याच्या कॉल डिटेल रेकॉर्ड्समधून ३० ते ४० महिलांचे संपर्क क्रमांक उघड झाले आहेत. एसआयटीने मोठी कारवाई करत खरात यांच्या ‘ईशानेश्वर’ मंदिराशी संबंधित ३ व्यक्तींना ताब्यात घेतले आहे त्यामध्ये मंदिराचा पुजारी आणि दोन कर्मचा-यांचा समावेश आहे. खरात याच्या फार्महाऊसवर नेमके कोणते प्रकार चालत होते आणि कोणत्या कारणासाठी लोकांना तिथे आणले जात होते, याचा तपास अधिकारी करत आहेत. यातून श्रद्धेच्या नावाखाली नेमके काय चालले होते, याचा पर्दाफाश होऊ शकेल. दरम्यान सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आरोप केला आहे की, तत्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी खरात यांना अवाजवी सवलती दिल्या असून या प्रकरणी जयंत पाटील यांचीही चौकशी झाली पाहिजे. एसआयटीने खरात याच्या केबिनमधून द्रव पदार्थ, ग्लास, बाटल्या आणि इतर यंत्रसामुग्रीसह मूळ पुरावे तपासासाठी जप्त केले आहेत. खरात याच्या विरोधात आणखी एका पीडित महिलेने तक्रार दाखल केली आहे. मोठमोठ्या लोकांसोबत खरातचे उठणे-बसणे असल्यामुळे त्याच्यावर होणा-या आरोपांवर कुणाचा विश्वास बसला नसता; पण थेट व्हीडीओ समोर आल्याने त्याचे खरे रुप बाहेर आले. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, खरातने तिच्यावर वारंवार अत्याचार केले. खरात अघोरी कृत्य करायचा आणि धमक्या द्यायचा. धक्कादायक बाब म्हणजे, ही पीडित महिला जेव्हा उपचारांसाठी येत असे तेव्हा खरात तिच्या पतीला बाहेर बसवून आतमध्ये ‘पूजा-विधी’च्या नावाखाली तिचे लैंगिक शोषण करत होता. भाविकांना घाबरवण्यासाठी तो नकली साप आणि वाघाच्या कातडीचा वापर करून अघोरी कृत्य करीत असल्याचा उल्लेख पीडितेने तक्रारीत केला आहे. जर या प्रकरणाची कुठेही वाच्यता केली तर पीडिता आणि तिच्या कुटुंबाला जीवे मारण्याची धमकीही त्याने दिली होती. तांत्रिक विद्या अवगत असल्याचा दावा करणा-या बुवाभोवती राजकारणी लोकांची गर्दी नवी नाही. तंत्रज्ञानाऐवजी तंत्रमंत्राच्या मागे धावण्याचे प्रकार स्तंभित करणारे आहेत. एकीकडे पुरोगामी महाराष्ट्राचा अभिमान मिरवायचा आणि दुसरीकडे बुवाबाबांच्या पायावर डोके ठेवत त्यांचे उदात्तीकरण करायचे हा नेत्यांचा दांभिकपणा जनता पाहत आली आहे. खरात याला गुरू मानणा-या रुपाली चाकणकर त्याचे पाय धुतानाची प्रसारित झालेली छायाचित्रे आणि व्हीडीओ अतिशय धक्कादायक आणि लाजीरवाणे आहेत. ही छायाचित्रे एका राजकीय पक्षाचे महत्त्वाचे पद भूषवणा-या चाकणकर यांची बुरसटलेली मानसिकताच दाखवत नाही तर आपल्या अशा वर्तनामुळे ढोंगी बुवाला समाजात प्रतिष्ठा मिळते इतकीही समज त्यांना नसल्याचे स्पष्टपणे दिसते.चाकणकर या केवळ राजकारणीच नव्हे तर अन्यायग्रस्त महिलांना न्याय मिळवून देण्याची जबाबदारी असलेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षाही होत्या. आता हे प्रकरण भोवल्याने त्यांना पदावरून पायउतार व्हावे लागले असले तरी या प्रकरणाचे गांभीर्य तसूभरही कमी होत नाही. प्रगल्भता नसलेल्या अशा महिला नेत्याला पक्षाने आजवर महत्त्वाची पदे दिलीच कशी? अशा निर्णयामुळे महिला आयोगाच्या अध्यक्ष पदासारख्या पदांना न्याय देण्याची क्षमता असलेल्या अन्य कर्तबगार महिला कार्यकर्त्यांवर अन्याय झाला आहे. महिलांवरील हिंसाचाराचे निर्मूलन हे महिला आयोगाने निश्चित केलेले मुख्य लक्ष्य आहे. ढोंगीपणासोबत जेव्हा लैंगिक गुन्हे करणा-या बुवांना राजकारणी शरण जातात तेव्हा ती बाब समाजाच्या दृष्टीने अधिकच गंभीर असते. देशभरात बुवा आणि राजकारण्यांची युती जनसामन्यांना मूर्ख बनवत आहे आणि जनताही आनंदाने बनत आहे. आसाराम बापू आणि राम रहिम यासारख्या बाबांचे उदाहरण आपल्यासमोर आहे. अमृत काळाची चर्चा होत असताना दुसरीकडे समाजाला शतकानुशतके मागे नेणा-या अशा घटना घडत आहेत ही दुर्दैवाची गोष्ट म्हणावी लागेल. नेहमीप्रमाणे आता राजकारणी खरात प्रकरणापासून आपले अंग झटकतील आणि नामानिराळे राहण्याचा प्रयत्न करतील. तपास पथकाने खरातला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणा-यांचे बुरखे फाडले पाहिजेत तरच अशा प्रकरणांना आळा बसू शकेल. दैवी शक्ती असल्याचा दावा करून अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या भोंदूबाबा अशोक खरातला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, त्याच्यावर कठोर कारवाई होईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. या प्रकरणात हवेत बोलण्यात काहीही अर्थ नाही. अशोक खरात हे गंभीर प्रकरण आहे. आम्हीच गुप्त माहितीच्या आधारे या प्रकरणाचा भांडाफोड केला, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात दिवसेंदिवस महिला आणि मुलींवरील अत्याचारांत वाढ होत आहे. हा महाराष्ट्र शिवरायांचा आहे त्यामुळे खरातसारखी बलात्कारी प्रवृत्ती कायमची मोडून काढायला हवी.

# रामनवमी शोभायात्रेत सांस्कृतिक वैभवाचा अनोखा ‘संगम’

**विदर्भ केसरी। यवतमाळ,**



श्रीराम नवमीनिमित्त येत्या गुरुवार, 26 मार्च रोजी यवतमाळ शहरात भव्य आणि आकर्षक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून, भारतीय संस्कृती, लोकपरंपरा आणि सामाजिक प्रबोधनाचा अनोखा संगम या सोहळ्यात पाहायला मिळणार आहे, अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे विदर्भ प्रदेश सेवाप्रमुख राम लोखंडे यांनी दिली.

यावेळी आयोजन समितीचे विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष मनोज औदार्य, प्रचार प्रसार प्रमुख राहुल ढोके, शहर अध्यक्ष गोविंद मोर, रामनवमी शोभायात्रा समितीचे संयोजक अभिजित डोंगरे, संतोष हरणखेडे, श्याम नाकोडे, मनीष बिसेन, सचिन तुरकर, अंकुश बगमारे हे पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना राम लोखंडे म्हणाले, श्री रामजन्मोत्सव शोभायात्रा समितीच्या वतीने आयोजित करण्यात येणारी ही शोभायात्रा यंदाही विविध वैशिष्ट्यपूर्ण आकर्षणांनी सजलेली असणार आहे. जयहिंद चौकातील श्रीराम मंदिरातून श्रीराम, माता सीता व लक्ष्मण यांच्या मूर्तींचे पूजन करून दुपारी 3 वाजता शोभायात्रेला प्रारंभ होईल.

यंदा दाक्षिणात्य शैलीत साकारण्यात आलेल्या सुशोभित रामरथामध्ये रामदरबार विराजमान राहणार असून, हा रथ रामभक्तांच्या हस्ते ओढण्यात येणार आहे. या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे गोवा येथील शिमगोत्सवात प्रथम क्रमांक पटकावणारा ‘दुर्गासुर वध’ चित्ररथ, गणपती व कार्तिकेय यांचे असुरांसोबतचे युद्धदृश्य तसेच ‘पुलिकाली’ वाघनृत्याचे सादरीकरण असणार आहे.

यासोबतच कर्नाटक येथील प्रसिद्ध बावली नृत्यदेखील सादर करण्यात येणार आहे. तसेच पांढरकवडा येथील 20 आदिवासी दंडार नृत्य कलाकार, दारव्हा तालुक्यातील 100 जणांचे भजनी मंडळ, कोलाम पोडांवरील डफ पथक, तसेच रामायणकालीन आणि सामाजिक विषयांवरील 100 हून अधिक देखावे या शोभायात्रेत सहभागी होणार आहेत. स्थानिक व्यायामशाळा व आखाड्यांमधील युवकांकडून पारंपरिक कसरतींचेही सादरीकरण होणार आहे. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी रांगोळी, भगवे ध्वज आणि पताकांनी सजावट करण्यात येणार असून भजनगायनाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

शहरात सध्या रामभक्तीचे वातावरण निर्माण झाले असून विविध ठिकाणी श्रीरामांच्या प्रतिमा व सजावट करण्यात आली आहे. या सोहळ्याच्या सुरक्षेसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून बजरंग दलाच्या 500 स्वयंसेवकांचा सुरक्षा समितीत समावेश करण्यात आला आहे. जयहिंद चौकातून सुरू होणाèया या शोभायात्रेचे संत सेना चौक येथे महाआरतीनंतर समापन होणार असून, उत्कृष्ट चित्ररथ व देखाव्यांना पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत.


# महाविकास आघाडीचा राष्ट्रीय महामार्गावर ठिय्या



**विदर्भ केसरी। दारव्हा**

तालुक्यातील भुलाई येथील टोलनाका बंद करण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या वतीने सोमवारी (ता.२३) आंदोलन करण्यात आले. यावेळी तब्बल तीन तास महामार्ग रोखून धरल्याने दारव्हा-कारंजा मार्गावरील वाहतूक विस्कळित झाली होती. चुकीच्या ठिकाणी टोल नाका सुरू करण्यात आल्याचा आरोप करीत कॉंग्रेस, ठाकरे सेना राष्ट्रवादी (शरद पवार) वतीने हा टोल नाका बंद करण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यासाठी सातत्याने आंदोलन सुरू आहे. सोमवारी आंदोलनाची हाक दिल्यानंतर सकाळीच पदाधिकारी, कार्यकर्ते भुलाई येथे पोहोचले, यावेळी प्रचंड घोषणाबाजी सुरू झाली. महामार्गावर ठिय्या मांडल्याने वाहतूक खोळंबली, लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या, त्यामुळे दारव्हाकडे येणारी वाहने तळेगावमार्गे तर कारंजाकडे जाणारी काही वाहने बोथमार्गे वळविण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग अधिकार्‍यांनी टोलच्या जागेचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाकडे पाठविल्याचे पत्र दाखवून आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले. परंतु त्या पत्राने समाधान झाले नाही. आत्ताच टोल बंद करण्याच्या मागणीवर आंदोलनकर्ते ठाम होते. बराच वेळ हा प्रकार सुरू होता. त्यानंतर आंदोलनकर्ते टोलच्या दिशेने निघाले असताना मोठ्या संख्येने असलेल्या बंदोबस्तातील पोलिसांनी त्यांना मध्येच रोखून धरले. गोंधळ सुरू झाल्याने धरपकड करून गाडीत बसविण्यात आले. अनेकजण आजूबाजूच्या शेतात शिरले. प्रमुख पदाधिकार्‍यांना दारव्हा येथे आणल्यानंतर हा मार्ग पूर्ववत सुरू झाला. या आंदोलनात काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राहुल ठाकरे, तालुकाध्यक्ष प्रकाश नवरंगे, नगरसेवक सैय्यद फारुक, सरफराज खान, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष अतुल राऊत, अ‍ॅड. मनोज कावळे, अजय गाडगे, संतोष ठाकरे, अमोल दुधे आदींसह महाविकास आघाडीचे अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू



संपूर्ण विदर्भात प्रतिनिधी पाहिजेत !

विदर्भातील निर्भीड, निष्पक्ष आणि जनतेच्या प्रश्नांवर थेट आवाज उठवणारे अग्रगण्य दैनिकदैनिक विदर्भ केसरी साठी

प्रत्येक जिल्हा, तालुका व प्रमुख शहरांमध्ये वार्ताहर / प्रतिनिधी / ब्युरो चीफ / उपसंपादक जाहिरात प्रतिनिधी तात्काळ पाहिजेत.

- पत्रकारितेची आवड असलेले
- सामाजिक व राजकीय घडामोडींची जाण असलेले
- स्वतःचे दुचाकी वाहन व मोबाईल असलेले
- अनुभवी तसेच नवोदित इच्छुकांना संधी

आपल्यात लेखनकौशल्य, धाडस आणि समाजासाठी काम करण्याची जिद्द असेल तर ही सुवर्णसंधी आहे!

इच्छुकांनी आपला बायोडाटा व फोटो खालील नंबरवर पाठवावा. (WhatsApp वर अर्ज स्वीकारले जातील)

संपर्क

संपर्क: 9975532291/9096945629
Gamil. vidarbhkesari@gmail.com
Web- www.vidarbhakesari.com

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## फायटर चाकू घेवून फिरणाऱ्यास अटक

उमरखेड : शहरात घातपाताच्या उद्देशाने फायटर चाकू घेवून फिरणाऱ्या एका युवकाला पोलिसांनी अटक केली. शेख शाहरुख रुस्तुम (२०) रा. डोंगरगाव गौल ता. महागाव असे या आरोपीचे नाव असून तो सध्या उमरखेडच्या तकीया परिसरात वास्तव्याला आहे. गुन्हे शोध पथकाने २२ मार्च रोजी ही कारवाई केली. पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे, संघशिल टेंभरे, किरण राठोड, दिगांबर गिते यांचा समावेश असलेले डीबी पथक उमरखेड हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मुखबीरद्वारे या आरोपीबाबत माहिती मिळाली.

# आयटक आशा संघटनेची जिल्हा परिषदेवर धडक

**▶विदर्भ केसरी। यवतमाळ**




यवतमाळ:- आयटक महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटनेचा मोर्चा शहीदे आझम भगतसिंग , राजगुरू , सुखदेव यांच्या शहीद दिन २३ मार्च रोजी श्रमशक्ती भवन येथुन निघालेला मोर्चा घोषणा देत शहरवासीयांचे लक्ष केंद्रित करत जिल्हा परिषद मार्गे सवीधान चौक , नेताजी मार्केट,दत्त चौक, बसस्थानक चौकातुन आर्णी रोड मार्गे यवतमाळ जिल्हा परिषदेवर धडकला मोर्चाचे नेतृत्व कॉम्रेड दिवाकर नागपुरे, जिल्हाकार्याध्यक्ष,आयटक यांनी केले आशा स्वयसेवीकांच्या मागण्यांचे निवेदन मा. ना.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई मा. ना. आरोग्य मंत्री, मा.ना.ग्रामीण, विकास मंत्री,मा.ना.नगर विकास मंत्री मुंबई यांना मा.मुख्ख कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांचे मार्फत पाठविण्यात आले त्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत आशा स्वयंसेविकांच्या प्रलंबित मागण्या व शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी व ऑक्टोबर पासूनचा थकित मोबदला अदा करण्यात यावा ह्या मुख्य मागण्या करण्यात आल्या. ग्रामीण व नागरी भागातील आशा स्वयंसेविकांना संदर्भिय शासन निर्णयानुसार कोरोना काळातील प्रोत्साहनपर रू.१०००/- प्रमाणे २२ महीण्याचे रक्कम अदा करण्यात यावी. याबात जि.प.पंचायत विभाग यवतमाळ व जि.प. आरोग्य विभाग यवतमाळ यांनी काढलेल्या पत्रावर गटविकास अधिकारी अंमलबजावणी करीत नसल्यामुळे चौकशी करण्यात येवून शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी संघटना कोरोणा काळा पासून संदर्भिय शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी म्हणून मागणी करीत आहे. पण यवतमाळ जिल्हा परिषद प्रशासनाने जिआरचा अर्थ एकच वेळा एक हजार रुपये अदा करण्यात यावे असा समजुन आशा स्वंयसेविकांना एक हजार रुपये अदा करण्यात आले आहे.परंतु संदर्भिय जिआरनुसार जिल्ह्यातील गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत कर्मचारी व अंगणवाडी सेविकांना २२ महीण्याचे २२ हजार रुपये अदा करण्यात यावे म्हणून अंमलबजावणी केलेली आहे. या बाबत ग्राम पंचायत कर्मचारी यांचे करीता जि.प.पचायत विभागाने काढलेल्या पत्रात रू.१०००/- प्रमाने २२ महीण्याची रक्कम अदा करण्यात यावी असे म्हटले आहे. या बाबत आम्ही पुरावे जोडले आहे. त्याचे अवलोकन करण्यात यावे, आशा स्वंयसेविकाकरीता मात्र २२ महीण्याची रक्कम अदा करण्यात यावी असे पत्रात म्हटले नाही. एकाच जिआरचा अर्थ ग्राम स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्या करीता वेग वेगळा काढल्या जात आहे . त्यामुळे मुळे आशा स्वंयसेविकांचे आर्थिक नुकसान होत आहे. जिल्हा परिषद प्रशासनाने राज्याच्या ग्राम विकास विभागाकडून व नगर विकास विभागाकडून आजवर गाईडलाईन्स मागुन, हा वीषय निकाली काढला नाही. त्यामुळे संघटनेला वारंवार आंदोलने करावी लागत आहे. सदर बाब सहानुभूतीने समजून घ्यावी व कोरोणा भत्याचा विषय निकाली काढण्यात यावा.वरील संदर्भिय शासन निर्णयानुसार कोरोणा काळात एकच महीना रू.१००० /-हजार रुपये देने आहे किंवा. कोरोना काळातील रू.१०००/- महीण्या प्रमाणे २२ महीण्याचे २२ हजार रुपये देने आहे. या संदर्भात जिल्हा परिषद प्रशासनाने संभ्रम दूर करण्यासाठी राज्याच्या ग्राम विकास विभागाकडून व नगर विकास विभागाकडून गाईडलाईन्स मागुन हा विषय निकाली काढण्यात यावा अशी आयटक संघटनेने मागणी केली आहे.

तसेच आशा स्वयंसेवकांना ऑक्टोबर महिन्यापासुन मानधन नाही, दोन दोन वर्षे वर्धनी केद्राचे , कुष्ठरोगाचे सर्वेचे, क्षयरोगाचे कामाचे .स्फुटम,पंतप्रधान मातृवंदन योजना या सारख्या कामाचे पैसे मीळत नाही राज्य सरकारचा मोबदला सुध्दा दोन तीन महीण्यापासुन मीळाला नाही त्यामुळे आशा स्वयंसेविकांवर उपासमारीची वेळ आली आहे. तेव्हा थक्कीत मानधन तातडीने अदा करण्यात यावे. व इतरही खालील मागण्या सत्वर निकाली काढाव्या , कोविड -१९ च्या अनुषंगाने सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या आशा स्वंयसेविकांना ग्रामीण व नागरी भागात जोखीम पत्करून कोरोना काळातील काम केले असल्यामुळे त्यांना नियमित वेतन व मानधना व्यतीरिक्त रू.१०००/- इतकी रक्कम २२ महीने अदा करण्यात यावी. वरील संदर्भिय प्ररिपत्रकानुसार जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यात यावी , आशा स्वंयसेविकांना दरमहा पाच तारखेपर्यंत केंद्र व राज्य शासनाचे एकत्रित व नियमित मानधन देण्यात यावे , आशा स्वंयसेविकांचे माहे ऑक्टोबर २०२५ पासुन चे थकीत मानधन त्वरीत अदा करा, आशा स्वंयसेविकाना शासनाने मोबाईल फोन, सिमकार्ड, व डाटा पैक दिलेला नाही. आशा स्वंयसेविकांकडे स्वतःचे अत्याधुनीक ॲन्ड्रॉईड 5G मोबाईल फोन नाहीत. तेव्हा जोपर्यंत आशा स्वंयसेविकांना ऑनलाईन कामे करण्यासाठी अत्याधुनीक ॲन्ड्रॉईड 5G मोबाईल फोन, सिम कार्ड व वर्षभर पुरेल एवढा डाटा पॅक दिला जात नाही, तोपर्यंत आशा स्वंयसेविका कोणत्याही प्रकारचे ऑन लाईन कामे करण्याची सक्ती करु नये.अंगणवाडी सेविकांच्या धर्तीवर आशा स्वंयसेविकांना पाच हजार रुपये दिवाळी भेट दिवाळीपुर्वी देण्यात यावी.,आशा स्वंयसेविकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर्षे करण्यात यावे.,आशा स्वंयसेविकांना प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा मागील दोन वर्षाचा मोबदला देण्यात आला नाही. तो देण्यात यावा. व इतरही कामाचा थकित मोबदला अदा करण्यात यावा.,आशा स्वंयसेविका आरोग्य विभागाचा कणा आहेत. त्यांना रात्री-बेरात्री काम करावे लागते. त्यांची नियुक्ती व सेवाशर्तीचे नियम ठरविण्यात आले आहेत. म्हणुन आशा स्वंयसेविकांना शासकीय सेवेत कायम करुन चतुर्थ श्रेणीचे वेतन देण्यात यावे. जोपर्यंत चतुर्थ श्रेणी लागू केली जात नाही, तोपर्यंत आशा स्वंयसेविकांना दरमहा रु. २५०००/- मानधन देण्यात यावे.,आशा स्वंयसेविकांना शासन नियमानुसार भरपगारी प्रसुती रजा देण्यात यावी.,आशा स्वंयसेविकांना आजारपणाची भरपगारी रजा देण्यात यावी.,आशा स्वंयसेविकांना शासनाने ठरवुन दिलेले कर्तव्य व जबाबदाऱ्या व्यतिरिक्त इतर कोणतेही कामे देण्यात येवु नये., विना मोबदला आशा स्वंयसेविकांना कामे सांगण्यात येवु नयेत.,आशा स्वंयसेविकांना मोबदला चिठठी देण्याचे आदेश मा. आयुक्तांचे असतानासुदधा मोबदला चिठठी दिली जात नाही. तेव्हा याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.,आशा स्वंयसेविकांना जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी रुग्ण घेवुन गेल्यास आणि तिथे मुक्काम पडल्यास आशांना मुक्कामासाठी आशा कक्ष स्थापन करण्याच्या मा. आयुक्तांचे आदेश असतानासुदधा याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. तरी याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.,आशा स्वंयसेविकांना अंगणवाडी कर्मचाऱ्याप्रमाणे दरवर्षी किरकोळ २० रजा व सार्वजनिक १२ सुटटया देण्यात याव्यात., नागरी क्षेत्रात कार्यरत आशा स्वंयसेविकांकरीता सेवा शर्तीचे नियम तयार करण्यात यावे.इत्यादी मागण्या करण्यात आल्या यावेळी कॉ.दिवाकर नागपुरे, सुनिता कुंभारे, विजया आत्राम, माया मरस्कोले, सुनिता सोनटक्के, राधा लीखेवार, सारीका येरमे,सविता सीडाम , अल्का राजगडकर, नितीना कुंभरे, अनिता अर्के, रेखा होले, अनिता पींपळे, किरण कांबळ, विजया तायडे,चंदा जयस्वाल, निता मोहळ, लीना निमकर, संध्या कातकिडे, बेबी भारती, रंजना मीटे, मीना गुढे, गंगा घुमे, पुष्पा मसराम, समशाद पठाण, अर्चना कडु, योगीता हेमने, विनिता वाठमोडे , माया इंगोले, इंदु जाधव,वर्षा मोहाळे, ज्योती मुजमुले, राखी पवार, गीता जाधव,शिला भगत, अर्चना माघाडे, चंचल केदार, छाया राठोड, अल्का पैठणकर, शोभा राहुलवाड, सुमन टेकाडे, अर्चना पाईकराव, ज्योती धुळे, अरूणा शींदे, सत्यभामा पवार, अरूणा शिंदे, कांता खरवडे, सुशीला आडे, अंजना मुरकुटे, विजया शेखावत, अनिता सावळे, सुवर्णा चव्हाण, शीला पवार, विश्रांती इंगळे, शुभांगी सुकळकर, शालीनी ढोके, उषा पांडोळे, सीमा जाधव, माया ठमके, शांता हुलगुडे, मीरा चक्रनारायन, कल्पना इंगळे, लता ठाकरे, मंगला बल्की,अंजु तुमराम , शिंदु गुरनुले, वैशाली दानखडे, निता सोयाम, अरूणा आस्वले, सितल येसेकार, ज्योती राऊत, दुर्गा मोहुर्ले , मीना भिमटे, रंजना मेश्राम, छाया खडतकर, दर्शना अहीरे, माया सातपुते, वर्षा चौधरी, मंगला रांखुडे, प्रतिभा ढोकने, रंजना राऊत, रंजना वानखडे, सुनंदा कांबळे, ज्योती तामगाडगे, मीना लुटे, विद्या लेंडे, संगीता सहारे, सविता वाघमारे, कविता कुळमेथे, सुकेशनी हलवले, वंदना सिडाम, मोर्चामध्ये मोठ्या संख्येने हजर होते

महत्त्वाचे



## नगरसेवक चंदु भाऊ चौधरी यांच्या हस्ते पानपोईचे उदघाटन

**▶विदर्भ केसरी। यवतमाळ प्रतिनिधी**

यवतमाळ : वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी तहसील कार्यालय परिसरात थंड पिण्याच्या पाण्याची पानपोई सुरू करण्यात आली. या पानपोईचे उद्घाटन नगरसेवक चंदु भाऊ चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. तहसील कार्यालयात दररोज शहरासह बाहेरगावाहून मोठ्या संख्येने नागरिक, विद्यार्थी तसेच महिला विविध कामांसाठी येत असतात. उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांना उभे राहणे कठीण होते व शरीरातील पाण्याची पातळी कमी होण्याचा धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी पिण्याच्या थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, सर्वसामान्यांकडून या उपक्रमाचे स्वागत व कौतुक करण्यात येत आहे. या प्रसंगी जगदीश टोंपे, गोकुल कोकेवार, कार्यक्रमाचे मुख्य आयोजक सामाजिक कार्यकर्ते अजय किन्हीकर, मनिष ढाले, प्रशांत काळे, श्रीकांत मानकर तसेच अनेक नागरिक उपस्थित होते.

## शिव पार्वती विवाह सोहळा यात्रेनिमित्त भव्य महिला खंजिरी संमेलन

**▶विदर्भ केसरी। शेलुबाजार वार्ता :-**



येथून जवळच असलेले ग्राम ईचा (नागी) येथे भव्य स्वरूपात शिवपार्वती विवाह सोहळा व यात्रेनिमित्त भव्य महिला खंजिरी संमेलन दि.22 मार्च 2026 रविवार रोजी सकाळी 11 ते दुपारी चार वाजेपर्यंत या भव्य दिव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले असून विविध गावातून दहा भजनी मंडळ व त्यांच्या समूह वाद्य तयारी सह येतील व त्यांना सन्मानित बक्षीस देऊन सत्कार करतील तसेच या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थ मंडळी मुख्य आयोजक सुधाकर भांडेकर शेलुबाजार, श्रीकृष्ण पंढरीनाथ राऊत. गोपाल ज्ञानदेवराव वानखडे, भानुदास शालिग्राम राऊत. अमित भाऊ गटागट शेलुबाजार, श्रीराम मोतीराम राऊत. सौ मैना भानुदास राऊत.सौ मोनिका अमित गटागट.महिंद्रा सावके हिरंगी. इत्यादी या कार्यक्रमांमध्ये सहभाग दर्शवून तसेच समस्त गावकरी मंडळी परिसरातील प्रमुख पाहुणे यांच्या मार्गदर्शनात व कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन मोठ्या प्रमाणात भव्य महिला खंजिरी संमेलनांचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून ठरलेल्या वेळेवरच कार्यक्रम सुरू होईल सर्वांनी उपस्थिती दर्शवावी असे विनंती आयोजकांनी केली आहे...!




## संघ मुख्यालयावरील 'जन आक्रोश' मोर्चाला पोलिसांची बंदी; शहरात तणावपूर्ण शांतता

**▶विदर्भ केसरी। सतीश भालेराव नागपूर:**

काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीतर्फे २३ मार्च रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS) मुख्यालयावर काढण्यात येणाऱ्या 'जन आक्रोश' मोर्चाला नागपूर पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. संघ मुख्यालय हे 'अतिसंवेदनशील' क्षेत्र असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे कारण पोलिसांनी दिले आहे.मोर्चा रोखण्यासाठी पोलिसांनी शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला असून, आंदोलकांना संविधान चौकातच रोखण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पोलिसांनी केवळ संविधान चौकात सभा घेण्याची मुभा दिली असली, तरी काँग्रेस आणि वंचितचे नेते मोर्चा काढण्यावर ठाम आहेत. यामुळे प्रशासन आणि आंदोलकांमध्ये संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून महाल परिसरातील सुरक्षा व्यवस्थेत मोठी वाढ करण्यात आली आहे.

## बीएलओ सोबत संपर्क साधावा

**▶विदर्भ केसरी। दर्यापूर**



दर्यापूर नगर परिषद हद्दीमधील खोलापुरी गेट, मोमिन पुरा, जुनी तहसील, खाटीक पुरा, राजपूत पुरा, मलिये पुरा, मातंग पुरा, चांभार पुरा, सौदागर पुरा, तेली पुरा दर्यापूर येथील सर्व मतदार बंधु भगिनींना सुचित करण्यात येते की 2002 ते 2004 नंतर लग्न झालेल्या सुनांचे कागद पत्रे पाहिजे मतदार यादी अपडेट करणे बाबत दर्यापूर येथील सर्व मतदार बंधु भगिनींना सुचित करण्यात येते की,एसआयआर (SIR) मतदार पुनरीक्षण यादीचे काम चालू आहे .यामध्ये आपल्या संपूर्ण गावांमध्ये बाहेरगावाहून आलेल्या सुनांनी खालील प्रमाणे माहिती त्वरित मागवून घेणे आवश्यक आहे.गावात आलेल्या सर्व सुनांनी आपल्या माहेरील आई, किंवा वडील ,आजी,आजोबा यांचे 2002 ते 2004 च्या यादीतील माहिती १) विधानसभा मतदारसंघ क्रमांक व नांव २) मतदार यादी भाग क्रमांक ३) यादीतील अनुक्रमांक ४) मतदार यादीतील नाव ही माहिती आणणे आवश्यक आहे.हि माहिती आपल्या BLO यांच्या कडे सादर करावी. न मिळाल्यास आपले नाव मतदार यादी मधुन वगळले जाऊ शकते.त्याकरिता सदर माहिती लवकरात लवकर बोलावून सादर करावी.न समजल्यास बीएलओ यांच्याशी संपर्क साधावा व आपले नाव नोंदवून घ्यावे असे आवाहन समाजसेवक निलेश पारडे यांनी केले आहे.

## मूर्तिजापूर येथे दहावे राज्यस्तरीय सृजन साहित्य संमेलन,अतिशय उत्साहात संपन्न !

**▶विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**




दहावे एक दिवसीय राज्यस्तरीय सृजन साहित्य संमेलन,मूर्तिजापूर येथे नुकतेच आनंद व उत्साहात संपन्न झाले. तीक्ष्णगत मल्टीपर्पज सोसायटी, अकोला व सृजन साहित्य संघ, मूर्तिजापूर व्दारा आयोजित भगवंत लॉन सभागृह मूर्तिजापूर येथे संपन्न झालेल्या या संमेलनाची सुरुवात, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वल करून करण्यात आली.मान्यवरांच्या स्वागत सत्कारानंत,उद्घाटक मा.प्रवीण नागपुरे,अतिथी डॉ.श्रीकांत तिडके,डॉ.अशोक इंगळे,ॲड.निता कचवे,मा.शंकर घोरसे,मा.अविनाश बेलाडकर,डॉ.तुषार बायस्कर, मा.गणेश भाकरे यांनी आपले विचार मांडले.संमेलनाध्यक्षा डॉ.मंदा नांदुरकर यांनी,साहित्य व तंत्रज्ञानाच्या सोबतीने होणारा प्रवास हा अधिक सुखकर राहिल,असे अध्यक्षीय भाषणातून नोंदवले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र जवादे यांनी तर आभार प्रमोद पंत यांनी मानले,अंबेचरण ननीर यांनी सुंदर सुत्र संचालन केले. यानंतर हास्य बळी डॉट कॉम या किशोर बळी यांच्या कार्यक्रमाने उपस्थितांना हास्यातून आनंदित केले. रंगलेले निमंत्रित कवींचे कविसंमेलन,दाद दयायला लावणारा गझल मुशायरा,रंगकवितेचे हे सन्माननिय कवींचे संमेलन व भावपूर्ण असा समारोपीय कार्यक्रम,अशा सत्रांमधून हे संमेलन स्मरणीय ठरले.

ढगोबाचे ढोल,संतश्रेष्ठ गजानन महाराज यांचे करूणाष्टक,येता जाता व स्मृतिगंध या पुस्तकांचे, या सोहळयात मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले. शेंद्रीय शेती करणाऱ्या हातगाव येथील स्वावलंबी शेतीगटाचा सन्मान करण्यात आला.रसिक श्रोत्यांची भरगच्च उपस्थिती या संमेलनात उल्लेखनिय ठरली. या संमेलनाच्या आयोजनात रवींद्र जवादे,प्रमोद पंत,विलास वानखडे,सुनिल ढोकणे,किशोर आष्टीकर,शैलेश गिरी,विनोद महल्ले,मीना जवादे,निलीमा आष्टीकर,प्रा. योगिता चिंचे,प्रा. वर्षा कावरे, रामकृष्ण आसरे,ज्ञानदेव भड,विलास निलखन आदी सर्व आयोजकांचे सहकार्य लाभले.

## तापत्या उन्हात सामाजिक माणुसकीचा झरा

**▶विदर्भ केसरी। चांदूर बाजार /-**



प्रखर उन्हाच्या झळा दिवसेंदिवस तीव्र होत असताना, समाजातील प्रत्येक घटकाला दिलासा देणारा उपक्रम म्हणून गो. सी. टोम्पे महाविद्यालयाच्या सौजन्याने स्व केशवदादा टोम्पे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पाणपोई उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहात व सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून संपन्न करण्यात आला. विद्यार्थ्यांसह परिसरातील नागरिक, शेतकरी, कामगार व प्रवाशांना उन्हाळ्यात शुद्ध व थंड पिण्याचे पाणी सहज उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने ही पाणपोई उभारण्यात आली आहे. तहानलेल्या पाणी ही संकल्पना आणि समाजसेवेचा अखंड संदेश देणारे संत गाडगेबाबा यांच्या विचारांवर प्रेरित होऊन हा उपक्रम साकारण्यात आला. समाजात स्वच्छता, सेवा आणि मानवतेचे मूल्य रुजविणाऱ्या या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला आहे. भास्करराव टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या आवारात ही सुविधा उभारून तिचे विधिवत अनावरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व संत श्री गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या वेळी उपस्थितांनी समाजसेवा आणि परोपकाराची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. उद्घाटक म्हणून राजेंद्र रामटेके यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "पाणी ही जीवनाची मूलभूत गरज असून, प्रत्येक तहानलेल्या व्यक्तीपर्यंत ते पोहोचविणे ही खरी समाजसेवा आहे." या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र रामटेके सर, सायन्स फॅकल्टीचे प्राचार्य नंदकिशोर गव्हाळे सर, पत्रकार सागर सवळे, क्रीडा मार्गदर्शक सुयोग गोरले ,निर्मिती पब्लिक स्कूल चे उपमुख्याध्यापक अजीम सौदागर सर, वारगे सर, सरोदे सर, सुमित सर, इंगळे सर, आकाश ढगे, शिरले मॅडम, कोथळकर सर, उबेद सर आदी मान्यवरांची , शिक्षक, व कर्मचारी, प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, समाजासाठी अशा उपयुक्त उपक्रमांची आजच्या काळात नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले. महाविद्यालयाच्या आवारात उभारलेली ही पाणपोई केवळ पाण्याची सोय नसून, ती माणुसकीचा झरा वाहता ठेवणारी एक प्रेरणादायी संकल्पना ठरत आहे. या उपक्रमामुळे उन्हाळ्यात पाण्यासाठी होणारी भटकंती कमी होऊन अनेकांना तात्काळ दिलासा मिळणार आहे. विशेषतः विद्यार्थी आणि काम करणाऱ्या नागरिकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या सामाजिक उपक्रमामुळे परिसरात समाधानाची भावना निर्माण झाली असून, भविष्यातही अशाच समाजोपयोगी कार्यांची परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.

## पावलांना फोड, तरीही कोलाम हक्कांसाठी जिद्द कायम !

### ७० किमीचा 'कोलाम एल्गार' लाँग मार्च यवतमाळात

**▶विदर्भ केसरी। यवतमाळ:**



अ तिमागास कोलाम समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी आणि 'शामादादा कोलाम स्वतंत्र अभ्यास आयोग' स्थापन करण्याच्या मागणीसाठी पुकारलेला ७० किलोमीटरचा पांढरकवडा ते यवतमाळ पायदळ लाँग मार्च आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे, रणरणत्या उन्हात आणि खडतर रस्त्यावरून सतत चालल्यामुळे शामादादा कोलाम ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा सौ. इंदिरा बोंदरे यांच्या पायाला मोठे फोड आले आहेत. प्रचंड वेदना होत असूनही, समाजाच्या न्यायासाठी त्यांनी विश्रांती नाकारत आपला निर्धार कायम ठेवला आहे आणि पदयात्रा सुरूच ठेवली आहे. प्रेस नोटचे प्रमुख मुद्दे: वेदनांवर मात करणारी जिद्दः सलग ७० कि.मी. पायदळ प्रवासामुळे सौ. इंदिरा बोंदरे यांच्या पायाला फोड आले आहेत, तरीही कोलाम बांधवांच्या हक्कासाठी त्यांनी माघार न घेता चालणे सुरूच ठेवले आहे. त्यांच्या या साहसामुळे आंदोलकांमध्ये नवीन चैतन्य निर्माण झाले आहे. नेतृत्वः सौ. इंदिरा बोंदरे आणि आदिवासी युवा नेते अतुल आत्राम यांच्या खंबीर नेतृत्वाखाली विघ्नहर्ता ग्रुप झोटिंगधरा येथील पुंडलिक टेकाम शेकडो कोलाम बांधव, महिला आणि तरुनांना घेवून ऐतिहासिक लाँग मार्चमध्ये सहभागी झाले आहेत. प्रमुख मागणीः कोलाम समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी शासनाने तात्काळ 'शामादादा कोलाम स्वतंत्र अभ्यास आयोग' गठित करावा, ही प्रमुख मागणी या आंदोलनाद्वारे लावून धरली आहे. प्रलंबित प्रश्नः कोलाम पोडांवरील रस्ते, वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव आणि सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, यासाठी हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. प्रशासनाला इशाराः यवतमाळ येथील पालकमंत्री संजय राठोड यांच्या निवासस्थानी हा मोर्चा धडकणार असून, जोपर्यंत आयोग स्थापन करण्यासाठी घोषणा होणार नाही तो पर्यंत पायदळ लाँग मार्च सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे

## रात्रीच्या अंधारात राजकारण्यांचा 'रेती पहारा' ; सत्ताधारी आणि विरोधकांची 'वाळू' युती

**▶विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड**

राजकारणात एकमेकांचे कट्टर शत्रू समजले जाणारे सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे नेते दिवसा एकमेकांवर उणीदुणी काढताना दिसतात. मात्र, धाबा , लाठी, पोडासा आणि तोहगाव परिसरात रात्रीच्या वेळी एक वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. हे नेते आणि कार्यकर्ते गावाच्या सुरक्षेसाठी नव्हे, तर चक्क नदी आणि नाल्यांमधून होणाऱ्या अवैध रेती उपशाला संरक्षण देण्यासाठी रस्त्यावर 'पहरा' देताना दिसत आहेत. यामुळे परिसरात संतापयुक्त चर्चेला उधाण आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या भागात रात्रीच्या सुमारास मोठ्या प्रमाणात रेतीचा अवैध उपसा केला जातो. महसूल वि भागाची गाडी किंवा अधिकारी आपल्या रेतीवाहनांना पकडू नये, यासाठी हे राजकीय नेते आणि त्यांचे कार्यकर्ते स्व तः रस्त्यावर उभे राहून 'वॉचमन'ची भू मिका बजावत आहेत. विशेष म्हणजे, या त कोणत्याही एका पक्षाचे लोक न सू न, सत्ताधारी आणि विरोधक दोघेही हा तात हात घालून महसूल विभागाला लाखो रुपयांचा चुना लावत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. सध्या ग्रामपंचायत स्तरावर आणि विविध विभागांतर्गत अनेक विकासकामे सुरू आहेत. या कामांसाठी लागणारी रेती पुरवण्याचे कंत्राट किंवा काम हेच 'रेती तस्कर' नेते करत आहेत. सरकारी कामात रेती वापरण्याच्या नावाखाली नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट केली जात आहे. जनतेच्या पैशातून होणाऱ्या कामांमध्ये स्वतःचा खिसा भरण्यासाठी या नेत्यांनी सर्व नियम धाब्यावर बसवले आहेत. या प्रकारामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड चीड निर्माण झाली आहे. "हे नेते आणि कार्यकर्ते खरोखरच लोकांचा विकास करण्यासाठी राजकारणात आले आहेत की स्वतःचे अवैध धंदे चालवण्यासाठी?" असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. वरिष्ठांच्या पुढे 'चपलुसीगिरी ' करून पदे मिळवायची आणि त्या पदाच्या जोरावर रेती तस्करी करायची, असा नवा पायंडा या भागात पडल्याचे दिसत आहे. एकीकडे राजकारण्यांची ही 'संगतमत' सुरू असताना दुसरीकडे महसूल विभाग याकडे डोळेझाक करत आहे का? असा संशय व्यक्त केला जात आहे. या अवैध रेती तस्करीमुळे पर्यावरणाचे नुकसान तर होत आहेच, शिवाय शासनाचा लाखो रुपयांचा महसूलही बुडत आहे. आता या प्रकरणावर जिल्हा प्रशासन काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भगतसिंह यांना अभिवादन

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

■ मॉर्निंग वॉक ग्रुप, दर्डा नगर यवतमाळच्या वतीने शहिदेआजम भगतसिंह, राजगुरू व सुखदेव यांना शहीददिनी अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष वसंत नाल्हे होते. प्रमुख अतिथी म्हणून सुरेश सलाम, रमेश पिसाळकर, शरद ढोबळे, शरद भगत होते. यावेळी क्रांतिकारी भगतसिंह यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरू वात करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या जीवन व कार्यावर माहिती दिली. शेवटी 'इन्कलाब जिंदाबाद'चे नारे देऊन समारोप केला.

### महत्त्वाचे



## कु.स्नेहल खरात हिने ९६.२५ एवढे गुण घेऊन मिळवला जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेश

**▸विदर्भ केसरी। वाशिम:-**

वाशिम जिल्ह्यातील वाघी गावातील कुमारी स्नेहल रामदास खरात हिचा ९६.२५ गुण घेऊन जवाहर नवोदय विद्यालय वाशिम येथे प्रवेशकरीता निवड झाली असून ती गावातील पहिली विद्यार्थींनी ठरली आहे. स्नेहल हिने बालवयात अतिशय मेहनत आणि कष्टाने आपले तथा आपल्या परिवाराचे नाव रोशन केल्याचे दिसुन येत आहे. स्नेहल ही श्री शिवाजी विद्यालय येवत्यात ५ व्या वर्गात शिक्षण घेत असून तिचे वर्गशिक्षक श्री रोही सर ह्यांनी दिलेल्या मोलाच्या मार्गदर्शनातुन हे यश प्राप्त झालं असे स्नेहल चे वडील रामदास खरात ह्यांच मत आहे. रामदास खरात हे उच्चशिक्षित असुन त्यांच्या परिवाराने शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे ह्या कहावती प्रमाणे शिक्षणाला महत्व दिल्याचे चित्र जिल्ह्यात आहे आणि त्या मध्ये त्यांचे कन्येला मिळाले यश हे त्यांचं उदाहरण आहे. शिक्षक शाळेत शिक्षण देतातच परंतु आई वडील ह्यांचे ही विशेष लक्ष आसन गरजेच आहे असे मत स्नेहल चे वडील रामदास कदम ह्यांनी व्यक्त केले. ह्या यशानंतर स्नेहल जिल्हाभरातून कुतूहल करण्यात आले आहे, ह्या मध्ये सामाजिक शैक्षणिक तथा राजकीय क्षेत्रातील दिग्गजानि स्नेहल रामदास खरात ह्यांची घरी भेट देऊन स्वागत ही केले आहे. तथा ग्रामस्थ आणि नातेवाईक मित्र परिवारा मध्ये आनंदाचे वातावरण आहे. तसेच ह्या बालवयात मिळालेल्या यशासाठी स्नेहल ला खुप खुप शुभेछा!

## श्री. गोविंद विद्यालयात शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना आदरांजली

**▸विदर्भ केसरी।मंगरूळपीर:**





येथून जवळच असलेल्या श्री गोविंद विद्यालय पार्डी ताड येथे शहीद भगतसिंग सुखदेव राजगुरू यांना विद्यालयाच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. शहीद दिनाचे औचित्य साधून भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या त्यागाची आठवण म्हणून हा दिवस शहीद दिन म्हणून पाळला जातो. याच दिवशी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना लाहोर मध्ये फाशी देण्यात आली. विद्यार्थ्यांना शहिदांच्या जीवन कार्याची माहिती व्हावी या हेतूने श्री.गोविंद विद्यालय, पार्डी ताड येथे शहीद दिन संपन्न झाला. शहीद दिनावर आधारित विद्यार्थ्यांनी ये भगतसिंग तू जिंदा है हर एक लहू के कतरे मे... हे गीत अतिशय योग्य प्रकारे विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण केले. या गीत गायनामध्ये दिपाली ठाकरे, ईश्वरी कुरवाडे, नंदिनी गावंडे, मोहिनी बोथे , रिया शेंद्रे, अंजली गावंडे, अंकीता ठाकरे, प्राजक्ता गावंडे, आणि जयश्री जाधव या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक जगदीश गावंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर शिक्षकांनी भगतसिंग सुखदेव राजगुरू यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळकृष्ण राऊत, प्रास्ताविक गोपाल गावंडे तर आभार प्रदर्शन मीना नानुटे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता आकाश ठाकरे, महादेव बोरकर व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## उमरखेड पोलिसांना मिळणार बळकटी

उमरखेड : शहरासह, परिसरातील कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी उमरखेड पोलिस ठाण्याला राऊंड कंट्रोल व्हॅनसह तीन नवीन बोलेरो वाहने पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या आदेशानुसार देण्यात आली असून, आमदार किसन वानखेडे तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन करण्यात आले. या नव्या राऊंड कंट्रोल व्हॅनमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असून, चारही बाजूंनी उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्यामुळे पोलिस नियंत्रण कक्षाशी थेट संपर्क साधून परिसरावर सतत नजर ठेवता येणार आहे. तसेच वाहनात फोकस कॅमेरे, मेमरी सिस्टिम व वायरलेस संच उपलब्ध असल्याने घटनास्थळी त्वरित माहिती मिळवणे आणि समन्वय राखणे अधिक सुलभ होणार आहे. नवीन बोलेरो वाहनांमुळे प्रभावीपणे पेट्रोलिंग करता येणार आहे. कोणतीही घटना घडल्यास तत्काळ प्रतिसाद देणे शक्य होईल, ज्यामुळे नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण अधिक बळकट होणार आहे.

# मृत्यूच्या छायेतून नवजीवनाकडे...

## खासदार देशमुख ठरले 'आशेचा किरण' ; थॅलेसेमिया ग्रस्त चिमुकल्याला दिला जीवनाचा आधार"

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**





जीवन आणि मृत्यू यांच्या सीमारेषेवर उभं असलेलं एक कुटुंब... डोळ्यांत काळजी, हातात पैसाच नाही आणि समोर लाखोंच्या उपचारांचा डोंगर! पिंपळनेर (ता. आर्णी, जि. यवतमाळ) येथील इंगळे कुटुंबावर आलेली ही वेळ अक्षरशः हृदय पिळवटून टाकणारी होती. अवघ्या ७ वर्षांच्या यश आशिष इंगळे या चिमुकल्याला थॅलेसेमिया मेजर या गंभीर आजाराचे निदान झाले आणि त्यांच्या कुटुंबाच्या आयुष्याने अचानक वेदनादायी वळण घेतले. पुढील उपचारासाठी त्याला बेंगलोर येथील भगवान महावीर जैन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी बोन मॅरो ट्रान्सप्लांट हा एकमेव उपाय असल्याचे सांगत सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे स्पष्ट केले... आणि इथेच कुटुंबाचे धैर्य खचले. नातेवाईक, मित्र, ओळखी — ज्या ज्या दारावर टकटक केली, तिथून निराशाच हाती आली. दिवसेंदिवस वाढणारी चिंता आणि हातातून निसटत चाललेली आशा... इंगळे कुटुंबासाठी प्रत्येक क्षण जणू संघर्षाचा बनला होता. मात्र, अंधार कितीही गडद असला तरी आशेचा एक किरण मार्ग दाखवतोच! एका साध्या व्हॉट्सॲप संदेशातून त्यांना माहिती मिळाली — "खासदार संजयभाऊ देशमुख गरजू रुग्णांना मदत करतात." हीच माहिती ठरली त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट! क्षणाचाही विलंब न करता कुटुंबीयांनी खासदारांचे स्वीय सहाय्यक गजानन कदम यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या आवाजातील वेदना ओळखत कदम यांनी त्यांना दिग्रस येथील वैद्यकीय सहाय्यता कार्यालयात बोलावले आणि "तुम्ही या... आपण नक्की मार्ग काढू," असा विश्वास दिला. यानंतर खासदार संजयभाऊ देशमुख यांच्यासमोर संपूर्ण परिस्थिती मांडण्यात आली. चिमुकल्या यशच्या आजाराची गंभीरता लक्षात घेत त्यांनी तातडीने पंतप्रधान सहाय्यता निधीकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. स्वीय सहाय्यक गजानन कदम यांनीही विलंब न करता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आणि प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि यश इंगळे यांच्या उपचारासाठी ३ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली. ही आनंदवार्ता समजताच इंगळे कुटुंबाच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले — पण यावेळी ते हताशतेचे नव्हते, तर नवजीवनाच्या आशेचे होते. "खासदार संजयभाऊ देशमुख आमच्यासाठी देवदूत ठरले," अशा शब्दांत कुटुंबीयांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली. संकटाच्या अंधारात जे हात आधार देतात, तेच खरे जीवनदाते ठरतात... आणि या घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले — संवेदनशील नेतृत्व असेल, तर निराशेच्या गर्तेतही आशेचा दिवा नक्की पेटतो

## सामाजिक बांधिलकीचा आदर्श ; पातुर्ड्यात गरजूंसाठी कपड्यांचे वितरण





### नोटरी क्लब, अकोल्याचा पुढाकार

**▸विदर्भ केसरी। संग्रामपूर।**

सणासुदीच्या काळात समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा आदर्श पातुर्डा बु. (ता. संग्रामपूर) येथे पाहायला मिळाला. रमजान ईद व मराठी नववर्ष गुढी पाडव्याच्या निमित्ताने नोटरी क्लब, अकोला यांच्या वतीने गरजू मुली व मुलांना कपड्यांचे वितरण करण्यात आले.

स्थानिक उद्योजक रमण चर्तभुज राठी यांच्या निवासस्थानी रविवार, २२ मार्च रोजी पार पडलेल्या या स्तुत्य कार्यक्रमात सुमारे १०० मुलींना फ्रॉक व ड्रेस तसेच मुलांनाही कपडे देण्यात आले. क्लबच्या सदस्या समीना नजमी यांच्या पुढाकारातून हा उपक्रम साकार झाला. अध्यक्ष सुनील साधवानी, सचिव मनोज मालोदे, समीना नजमी व इस्माईल नजमी यांच्या हस्ते लाभार्थींना कपड्यांचे वितरण करण्यात आले. लहान मुलींना फ्रॉक तर मोठ्या मुलींना ड्रेस देण्यात आले. नव्या कपड्यांचा आनंद लाभार्थी मुलींच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे झळकत होता. या उपक्रमामुळे सणाचा आनंद अधिकच द्विगुणित झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. नोटरी क्लब, अकोला यांच्या वतीने यापूर्वीही पातुर्डा परिसरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले असून, अपंगांसाठी व्हीलचेअर वाटप, नेत्ररुग्णांसाठी मोतीबिंदू तपासणी व उपचार, मोफत शस्त्रक्रिया तसेच चष्मे वाटप करण्यात आले आहे. या प्रसंगी रमण चर्तभुज राठी, विजमोहन चितलांगे, अजय सेननगर, उज्वल दुबे, अशोक अग्रवाल, मनोहर निरवाणी, रीता खडसे, डॉ.रघुनाथ खडसे, डॉ.सत्यनारायण खोरिया, डॉ.जयंतीलाल वाघेला, ओमप्रकाश गोयनका, मोहन काकाणी, काजल राजवैध, प्रचशील चौधरी, कोमल साधवाणी, ज्योती अग्रवाल, लोकेश राठी, पत्रकार मिर मकसुद अली, साधू गावंडे, विष्णू गांधी आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते. या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## पालिका स्थायी समितीची सभा

### विद्यार्थ्यांना दिला टॅब

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

नगर पालिकेची स्थायी समितीची सभा सोमवारी (ता. २३) पार पडली. साधारणतः तासभर चाललेल्या सभेत एक वगळता ८५ विषय मंजूर करण्यात आले आहे. विद्युत, आरोग्य आणि बांधकाम विभागातील कामांचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे. नगर पालिकेच्या स्थायी समितीची सभा नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला उपाध्यक्ष दत्ता कुळकर्णी, मुख्याधिकारी शुभम क्यातमवार, सर्व विषय समिती सभापती आणि स्थायी संमती सदस्य उपस्थित होते. पहिल्याच सभेत तब्बल ८६ विषय चर्चेसाठी ठेवण्यात आले होते. शहरातील २० पेक्षा जास्त हायमास्ट लाइट उभारणे, नवीन पथदिवे लावून प्रकाश योजना करणे, विद्युत विभागाच्या निविदा मंजूर करणे, तीन इमारतींवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे, शिवाजी चौक आणि गाडगे महाराज मंदिर या दोन ठिकाणी म्युरल तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. पालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणार्‍या सहावीच्या विद्यार्थ्यांमधून प्रावीण्य प्राप्त प्रत्येकी एका विद्यार्थ्याला टॅब देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एव्हढ्या मोठ्या प्रमाणात प्रस्तावित विषय असल्यामुळे सभा मॅरेथॉन वेळेपर्यंत चालेल, असे बोलल्या जात होते. मात्र, अवघ्या तासाभरात तब्बल ८५ विषयाला मंजुरी देवून सभा गुंडाळण्यात आली

## प्रशासकीय यंत्रणेत 'देशद्रोही' प्रवृत्तीचा सुळसुळाट

### ज्येष्ठ व्याख्यात्याचा जिल्हा प्रशासनाकडे संताप

**▸विदर्भ केसरी। वाशिम |**

जिल्हा प्रशासन आणि जिल्हा परिषद अं तर्गत होणाऱ्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आणि बो ग सगिरी होत असल्याचा खळ ब ळजनक आरोप ज्येष्ठ व्याख्याते पांडुरंग ठाकरे यांनी केला आहे. खोटे प र्य टन स्थळ दाखवून आणि बोगस का मे मंजूर करून शासनाची दिशाभूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी थेट 'देशद्रोही' संबोधले असून, याप्रकरणी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

■ **नेमके प्रकरण काय?**

पांडुरंग ठाकरे (वय ७२) हे गेल्या ५ २ वर्षांपासून ग्रामपंचायत ते जिल्हा नियोजन विभाग आणि 'यशदा' सारख्या नामांकित संस्थेत व्याख्याता म्हणून का र्यरत आहेत. त्यांनी जिल्हाधिकारी आ णि मुख्य कार्यकारी अधिकारी, वा शिम यांना पत्र लिहून प्रशासनातील गंभीर त्रुटींकडे लक्ष वेधले आहे. त्यांच्या मते, जिल्हा कार्यालयापासून अवघ्या २० मिनिटांच्या अंतरावर असलेल्या उमरा कापसे, पांडव-उमरा आणि घुमका-तोंडगाव या ठिकाणच्या पर्यटन स्थळांची व विकासकामांची सद्यस्थिती पाहिल्यास मोठा भ्रष्टाचार उघड होऊ शकतो.

**बोगस कामांचा आरोप:** का गदोपत्री पर्यटन स्थळे दाखवून प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेली किंवा अत्यंत निकृष्ट दर्जाची बोगस कामे मंजूर केली जातात हा.प्रश्न.आहे चारही पर्यटन स्थळाचे अंदाजपत्रक समान ३१ लाख रु समान असल्याचा दावा ठाकरे यांनी केला आहे.

विशेषतः जुन्या कामांवर नवीन निधी दाखवून असेही निधी लाटण्याचे प्रकारही घडत असल्याचे त्यांनी मा जिल्हा धिकारी यांचे निदर्शनास २० दिवसापूर्वीच आणले. शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकणारे आणि प्रशासनाची दिशाभूल करणारे संबंधित लिपीक आणि कर्मचारी हे 'देशद्रोही' असल्याचे त्यांनी पत्रात अत्यंत कडक शब्दांत नमूद केले आहे. मा.उच्च न्यायालयात याचिकाः या गैरप्रकाराविरोधात त्यांनी केवळ तक्रारच केली मा.उच्च न्यायालयात रीतसर याचिका दाखल केली आहे.

यापूर्वी १८ मार्च २०२६ रोजी सुद्धा त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना या संदर्भात अर्ज दिला होता, ज्याची प्रत त्यांनी त्यांच्या पत्रासोबत जोडून प्रशासनाला मागील तक्रारीची आठवण करून दिली आहे.

### प्रशासनाला जाहीर आवाहन

■ **"मी ७२ वर्षांचा लोकसेवक म्हणून हात जोडून विनंती करतो की, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः या स्थळांना (विशेषतः उमरा कापसे) प्रत्यक्ष भेटी देऊन वस्तुस्थिती तपासावी," असे आवाहन पांडुरंग ठाकरे यांनी पत्राद्वारे केले आहे. सामान्य प्रशासन विभागाकडे हे पत्र सुपूर्द करण्यात आले असून, आता जिल्हा प्रशासन या 'बोगस' कामांवर आणि संबंधित 'देशद्रोही' प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

## अन्न छत्रालयास भोग पूजनाने सुरुवात

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसद - श्रीराम नवमी निमित्त पोहरादेवी येथे जाणाऱ्या सेवालाल भक्तांसाठी इंद्रनील नाईक यांच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या सेवालाल महाराज गोर छात्रालय पुसद येथे ना. श्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते भोगपूजन करून अन्नछत्रलयाची सुरुवात करण्यात आली. सेवालाल भक्तांची सेवा हीच खरी ईश्वर सेवा असल्याचे मत याप्रसंगी नाईक यांनी व्यक्त केले.

स्व. राज नाईक यांनी अन्नछत्रलयाच्या माध्यमातून सेवालाल भक्तांची सातत्याने सेवा केल्यामुळे स्व. राज नाईक यांच्या कार्य कर्तृत्वाला उजाळा देऊन गोर अन्नछत्रालय च्या माध्यमातून सेवालाल भक्तांची सेवा करणाऱ्या अन्न छत्रालयाच्या सेवेकरी मंडळीचे ना. नाईक यांनी अभिनंदन केले.या गोर अन्न छत्रालयाच्या उद्घाटन प्रसंगी ना. श्री इंद्रनील नाईक, महंत जितेंद्र महाराज, राजूदासजी जाधव, कैलास महाराज हेगडी, रामेश्वर महाराज पिंपळगाव, दीपक आसेगावकर उमाभाऊ पापींनवार ,श्रीराम पवार, दयाराम चव्हाण, राजेश सोळंके, विठ्ठल खडसे सर विजय जाधव, अभिजीत पानपट्टे, बाबूसिंग आडे, ऋषिकेश पंडितकर, अक्षय महाकाळ, करण ढेकळे, सुनील ढाले, मजहर खान, झहीर भाई, निखिल ठाकरे, नितीन पवार, अशोक वडते, बि झी राठोड, आशिष काळबांडे, कयूम भाई, इरफान भाई, किशोर कांबळे, प्रा सुनील खाडे, मदन भाऊ गायकवाड, डॉ. मधुकर नाईक रणवीर पाटील, यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नरेंद्र जाधव त्यांनी केले. प्रस्ताविक प्रा. संजय चव्हाण तर आभार प्रदर्शन उत्तम जाधव मानले

## १०६६ रुपयांचे तिकीट, ८०० किमीचा प्रवास...

### पण धूळ-मातीने भरलेली बस; प्रवाशांचा संताप बस

**▸विदर्भ केसरी।(नागपूर)राजहंस शेंडे, प्रतिनिधी**





नागपूर ते सोलापूर या सुमारे ८०० किलोमीटरच्या लांब पल्ल्याच्या मार्गावर धावणाऱ्या एमएच 40 सीएम ६२९१ क्रमांकाच्या बसची अत्यंत निकृष्ट व अस्वच्छ अवस्था समोर आल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. बसमध्ये मोठ्या प्रमाणात धूळ-माती साचलेली असून स्वच्छतेचा पूर्णपणे अभाव असल्याचे प्रवाशांनी सांगितले. परिणामी बसमध्ये प्रवास करताना प्रवाशांचे कपडे खराब होत असून संपूर्ण प्रवास त्रासदायक ठरत आहे. विशेष म्हणजे या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी प्रवाशांकडून तब्बल १०६६ रुपये इतके तिकीट आकारले जात असतानाही प्रवाशांना अशा दर्जाहीन बसमधून प्रवास करावा लागत असल्याने राज्य परिवहनच्या सेवेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सुमारे ८०० किमीचा प्रवास अशा अस्वच्छ व जीर्ण अवस्थेतील बसमध्ये करावा लागणे म्हणजे प्रवाशांच्या सुरक्षिततेशी आणि सोयीशी सरळ खेळ असल्याची प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, अशा अवस्थेतील बस रस्त्यावर धावत असल्यामुळे एखादी गंभीर दुर्घटना घडली किंवा एखाद्याचा जीव गेला तर त्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार? असा संतप्त सवालही प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर बस डेपोच्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई करावी तसेच नागपूर–सोलापूर मार्गावर स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जेदार बसची व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# शरद जोशींच्या विचारांनीच शेतकरी सुखी होईल.

## मूर्तिजापूरच्या शेतकरी साहित्य संमेलनात सरोजताई काशीकर यांचे प्रतिपादन.

**▸विदर्भ केसरी।मूर्तिजापूर**





शेतकरी चळवळीचे प्रणेते स्व. शरद जोशी यांनी मांडलेले विचार आणि त्यांनी दिलेली दिशा आजही शेतकऱ्यांच्या मुक्तीचा मार्ग आहे, असे ठाम प्रतिपादन माजी आमदार सरोजताई काशीकर यांनी केले. पुंडलिक नगर येथे आयोजित ५ व्या 'शेतकरी साहित्य संमेलना'च्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

■ **महिलांच्या सहभागाशिवाय चळवळ अपूर्ण**

आपल्या भाषणात सरोजताईंनी ८० च्या दशकातील शेतकरी चळवळीच्या संघर्षाला उजाळा दिला. विशेषतः चांदवड येथील ऐतिहासिक महिला अधिवेशनाचा उल्लेख करताना त्या म्हणाल्या, "त्याकाळी लाखो महिलांनी चूल आणि मूल सोडून आंदोलनात उडी घेतली होती. महिलांच्या या अभूतपूर्व सहभागामुळेच चळवळीला मोठी ताकद मिळाली." महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता शेती प्रश्नावर सक्रिय होण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

■ **साहित्यातून शेतकऱ्यांचे वास्तव मांडण्याची गरज**

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. श्रीकांत तिडके यांनी आपल्या भाषणात शेतकरी साहित्याच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. शेतकऱ्यांचे दुःख, त्याच्या व्यथा आणि लढाऊ बाणा साहित्याच्या माध्यमातून जगासमोर येणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

■ **दिग्गजांची उपस्थिती**

या संमेलनाला शेतकरी संघटनेचे अनेक ज्येष्ठ नेते आणि कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. यामध्ये प्रामुख्याने माजी जिल्हाध्यक्ष विजय लोडम, सुरेश जोगळे, अरविंद तायडे, विजय मोरे, शरद सरोदे, पप्पू पाटील तिडके, बाळासाहेब तायडे, गुलाबराव म्हसाये, शिलाताई जोगळे, मीराताई लोडम, सतीश दानी माजी युवा नेते यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुंडलिक नगर येथील ग्रामस्थांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या संमेलनाच्या माध्यमातून शरद जोशींच्या विचारांची पुनरावृत्ती झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## ५५ विद्यार्थ्यांची विमानवारी

### महादीप परीक्षा; विद्यार्थ्यांसह पालकांचा गौरव



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात येणार्‍या महादीप परीक्षेत जिल्ह्यातील ५५ विद्यार्थी विमानवारीकरिता पात्र ठरले. सोमवारी (ता. २३) जि. प.च्या सभागृहात विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. तद्नंतर दुपारच्या सुमारास नागपूर विमानतळावरून हवाई सफर करत बेंगळूर येथील इस्रो केंद्राच्या अभ्यासदौर्‍यास रवाना झाले. जि. प. शिक्षण विभागामार्फत सलग पाचव्या वर्षी महादीप परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत जि. प. शाळांमधील ५५ विद्यार्थी प्रावीण्य प्राप्त झाले. या विद्यार्थ्यांचा सत्कार उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर आभाळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी युवराज मेहत्रे, प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा, उपशिक्षणाधिकारी डॉ. नीता गावंडे, महादीप जिल्हा समन्वयक प्रणिता गाढवे, विस्तार अधिकारी राजू मडावी, गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, क्रांती खेडकर, खैरनार, विजय बेतेवाड, प्रज्ञा पाटील उपस्थित होते. गुणवंतांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, ट्रॅकसुट, सायकल भेट दिली. डिसेंबर अखेरीस झालेल्या ५० गुणांच्या वस्तुनिष्ठ परीक्षेतून ५५ गुणवंतांची अंतिम निवड झाली. मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून विद्यार्थ्यांना रवाना करण्यात आले.

Selected

## हनुमान वॉर्ड येथे संगीतमय शिवमहापुराण कथा सोहळा संपन्न



देसाईगंज - रामनवमीच्या पावन निमित्ताने देसाईगंज येथील साईबाबा मंदिर, हनुमान वॉर्ड येथे भव्य संगीतमय शिवमहापुराण कथा सोहळा मोठ्या उत्साहात नुकताच पार पडला. या भक्तिमय कार्यक्रमाला आमदार रामदासजी मसराम यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी मंडळाच्या वतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. भजन, कीर्तन आणि संगीतमय कथनामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती कार्यक्रमाची शोभा वाढवणारी ठरली. त्या प्रसंगी उपस्थित : माजी आमदार डॉ. देवराव होळी, नरेश विठ्ठलांनी नप उपाध्यक्ष वडसा, नगरसेवक तथा गटनेता विकास प्रधान नगरसेवक राजू रासेकर, नगरसेवक राजू जेठानी, नगरसेवक भरत बावनथळे उपस्थित होते.

---


## पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार उद्योजक मेळाव्याचे आयोजन...

गडचिरोली :- गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली, दे-आसरा फाऊंडेशन, आणि इनक्यूबेशन कम बिझनेस फॅसिलिटेशन सेंटर, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने गोंडवाना विद्यापीठ, कोटगल रोड गडचिरोली येथे दिनांक २५ मार्च २०२६ रोजी ११.०० वाजता पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार / उद्योजक मेळावा, आयोजित करण्यात आलेला आहे. सदर रोजगार/उद्योजक मेळाव्यामध्ये डॉ. रविंद्र अहेर (बिझनेस ग्रोथ स्ट्रॅटजिस्ट), अमर नायसे (ब्रेन ऑप्टीमायझेसन कोच) व अनिरूदध आठवले (मेंटर इनफेड-IIM नागपूर) उपस्थित राहणार असून उमेदवारांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी याबाबत मार्गदर्शन करणार असून विविध नामांकित कंपन्या सुध्दा सहभागी होणार आहेत. सदर रोजगार / उद्योजक मेळाव्याकरिता ईच्छूक असलेले उमेदवारांनी /उद्योजकांनी २५ मार्च २०२६ रोजी गोंडवाना विद्यापीठ, कोटगल रोड गडचिरोली येथे सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहून रोजगार/ उद्योजक मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली यांनी केले आहे.

# चामोर्शी तालुक्यातील जमीन अधिग्रहणाचा मुद्दा संसदेत गाजला!

### स्थानिक शेतकऱ्यांना न्याय देण्याची खासदार डॉ. नामदेव किरसान यांची मागणी

विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम




देसाईगंज : गडचिरोली जिल्ह्याला 'स्टील हब' म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या जमीन अधिग्रहण प्रक्रियेचा मुद्दा, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित करत गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी स्थानिक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक प्रकल्प उभारण्याचे नियोजन सुरू असून, त्यासाठी सुपीक शेतीजमिनींचे अधिग्रहण केले जात आहे. लॉइड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड (Lloyd's Metals) तसेच जेएसडब्ल्यू स्टील यांसारख्या औद्योगिक कंपन्यांसाठी मोठ्या प्रमाणात जमिनीची आवश्यकता असून, लॉइड्स मेटल्सच्या विस्तारासाठी सुमारे ४,५०० हेक्टर तर प्रस्तावित जेएसडब्ल्यू स्टील प्रकल्पासाठी सुमारे ३,५०० हेक्टर जमीन आवश्यक आहे. या अनुषंगाने जयरामपूर व मुधोली तसेच भेंडाळा परिसरातील सुमारे १४ गावांमधील सुपीक शेतीजमिनींचे मोजमाप सुरू करण्यात आले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सुमारे ७८ ते ८० टक्के क्षेत्र जंगलाखाली असून, उर्वरित मर्यादित जमीन हीच स्थानिक शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. ही जमीन प्रामुख्याने धान पिकासाठी उपयुक्त असल्याने तिचे भूसंपादन केल्यास शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम होऊन ते भूमिहीन होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांकडून अधिग्रहण प्रक्रियेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, आष्टी येथील 'BILT' पेपर मिल लॉइड्स मेटल्स कंपनीकडे हस्तांतरित झाल्यानंतर तेथील सुमारे ४०० कामगारांच्या रोजगारावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे. संबंधित कामगारांचा रोजगार सुरक्षित ठेवण्यात यावा, अशी मागणी खासदार डॉ. किरसाण यांनी केली आहे. तसेच शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय कोणतेही भूसंपादन करण्यात येऊ नये. तसेच प्रभावित शेतकऱ्यांना बाजार भावानुसार योग्य, न्याय्य व समाधानकारक मोबदला देण्यात यावा. सुपीक शेतीजमिनींचे संरक्षण करून उद्योगांसाठी प्राधान्याने पडीक किंवा कमी उपयुक्त जमिनींचाच वापर करण्यात यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. गडचिरोली जिल्ह्यातील विकास प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हक्कांचा समतोल राखणे आवश्यक असून, शासनाने या बाबीकडे संवेदनशीलतेने लक्ष देण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## गुढीपाडवा नव्या सकारात्मकतेची सुरुवात करणारा उत्सव..!

विदर्भ केसरी । कुरखेडा

गुढीपाडवा हा केवळ सण नसून नव्या आशा, उत्साह, सकारात्मकतेची सुरुवात करणारा पवित्र उत्सव असून कढोली येथे शेकडो वर्षापासून गुढीपाडवा उत्सव साजरा करण्याची परंपरा ही अभिनंदनिय असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष माजी पंचायत समिती सदस्य चांगदेव फाये यांनी केले. ते हनुमान देवस्थान कमिटी व समस्त ग्रामवासी कढोली यांच्या वतीने गुढीपाडवा उत्सव गोपालकालाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या भेटी प्रसंगी मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष माजी सरपंच चंद्रकांत चौके, सेवाकर सहारे, बंटी देवढगले, प्रतिष्ठित नागरिक मनोहर सुरणकर, आविका संस्थेचे माजी सभापती फाल्गुन चौके, रामजी सोनुले, सोमाजी मुर्वतकर, तुळशीदासजी नागोसे, गावतुरे महाराज हनुमान देवस्थान कमेटीचे अध्यक्ष दिनेश निंबेकर, मोरेश्वर गरमळे, विनोद श्रीरामे, जितेंद्र भोयर, रतन गायकवाड, छगन टेकाम व प्रतिष्ठित नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी ह.भ.प. दिलाशाताई मेघश्याम ठलाल यांच्या संचासहित कीर्तनाचा व विविध भजनी मंडळींनी भजन व विविध कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हनुमान देवस्थान कमिटीचे अध्यक्ष दिनेश निंबेकर, उपाध्यक्ष मोरेश्वर गरमळे, सचिव विनोदजी श्रीरामे, सहसचिव जितेंद्र भोयर, कोषाध्यक्ष रतन गायकवाड, उपकोषध्यक्ष छगन टेकाम, फाल्गुन चौके, विलास चौके, टिकाराम मुरवतकर, बंडू धारने, बंडू आकरे, शेषराव गरमळे, किशोर ठाकरे, जगदीश गरमळे, धनराज वाकडे, नुसाराम दडमल, खुशाल धारणे, पत्रु वाकडे, दुधराम चौके, देवानंद रंधये, कमलेश रंधये, हरिदास चौधरी, ज्ञानेश्वर गावतुरे, नरेश नारनवरे, स्वप्रिल मेश्राम आत्माराम वाटगुरे, रवी टेकाम, माणिक गरमळे व हनुमान देवस्थान कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी पदाधिकारी भाविकभक्त नागरिक महिला भगिनी बालगोपाल उपस्थित होते.

## ॲम्बुलन्सच्या नावाखाली दारू तस्करीचा पर्दाफाश..!

विदर्भ केसरी । गडचिरोली



जिल्ह्यामध्ये ॲम्बुलन्ससारख्या अत्यावश्यक सेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांचा गैरवापर करून अवैध दारूची तस्करी करणाऱ्या टोळीचा आष्टी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तब्बल 12 लाख 28 हजार 800 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. दि. 22 मार्च 2026 रोजी सायंकाळी 7 ते 8 वाजण्याच्या सुमारास, आष्टी ते आलापल्ली मार्गावर महात्मा फुले महाविद्यालयाजवळ पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचला. यावेळी एक पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी ईको (क्र. MH 34 BR 5753) ही गाडी, ज्यावर लाल अक्षरात 'ॲम्बुलन्स' असे लिहिले होते, संशयावरून थांबवून तपासणी करण्यात आली. या प्रकरणी सुलतान महोम्मद शेख (वय 27) व सौरभ चंदू गायकवाड (वय 33) या दोघांना अटक करण्यात आली आहे. हे दोघेही चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी असून मजुरीचा व्यवसाय करतात. पोलिसांनी सांगितले की, आरोपी कोणत्याही वैध परवान्याशिवाय दारूची वाहतूक करत होते. त्यामुळे महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम 65 (अ), 83 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिस उपनिरीक्षक मदन मुकुंदराव मस्के यांनी तपासाची सूत्रे हाताळली असून, प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी कारवाई पार पडली. सध्या पोलिस या प्रकरणातील संपूर्ण नेटवर्कचा तपास करत असून, या मागे आणखी मोठी साखळी असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## रुग्णालय परिसरातील क्वार्टरची बत्ती गुल..!

### गडचिरोलीत सामान्य रुग्णालयावर वीज विभागाची मोठी कारवाई

विदर्भ केसरी । गडचिरोली




गडचिरोली जिल्ह्यातील सामान्य रुग्णालयासह आठ मोठ्या शासकीय रुग्णालयांवर वीज बिलाची सुमारे ४ कोटी रुपयांची थकबाकी असल्यामुळे वीज विभागाने आज कठोर पाऊल उचलत वीजपुरवठा आंशिक स्वरूपात खंडित केला आहे. या कारवाईमुळे आरोग्य यंत्रणेत एकच खळबळ उडाली असून कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. माहितीनुसार, दीर्घकाळ वीज बिल न भरल्यामुळे वीज विभागाला नाईलाजाने ही कारवाई करावी लागली. मात्र, रुग्णसेवा अबाधित राहावी यासाठी ज्या ठिकाणी प्रत्यक्ष उपचार सुरू आहेत त्या विभागांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आलेला नाही. परंतु रुग्णालय परिसरातील निवासी क्वार्टर्स, काही प्रशासकीय कार्यालये व इतर विभागांची वीज आज बंद करण्यात आली आहे. या निर्णयानंतर रुग्णालयातील कर्मचारी व अधिकारी संतप्त झाले असून त्यांनी प्रशासनाविरोधात रोष व्यक्त केला आहे. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्या राहत्या घरांचे वीज व पाणी बिल दर महिन्याला पगारातून नियमितपणे कपात केले जाते. तरीही अचानक वीजपुरवठा खंडित केल्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. "आमच्या पगारातून रक्कम कपात होत असताना संबंधित बिल वीज विभागाकडे वेळेत का भरले गेले नाही?" असा थेट सवाल कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे रुग्णालय प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, या संदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा लहाडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांनी फोन उचलला नाही. तर अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. छाया उईके यांनी या प्रकरणाची माहिती देण्यास नकार देत संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे सांगितले. त्यांच्या या भूमिकेमुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. या घटनेमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्येही नाराजी वाढत असून, ज्यांची कोणतीही चूक नाही अशा कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना या कारवाईचा फटका बसत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आता न्यायासाठी कुणाकडे धाव घ्यायची, असा सवाल उपस्थित होत आहे. मुख्यमंत्र्यांच्या विशेष लक्ष असलेल्या जिल्ह्यात अशा प्रकारची प्रशासकीय ढिसाळपणा समोर येत असल्याने जिल्ह्याच्या प्रतिमेलाही

# गडचिरोलीत 15 दिवस जमावबंदी : जिल्हादंडाधिकारी

विदर्भ केसरी । गडचिरोली

जिल्ह्यात दिनांक 26 मार्च 2026 रोजी श्रीरामनवमी उत्सव तसेच दिनांक 02 एप्रिल 2026 रोजी हनुमान जयंती जिल्ह्यात सर्वत्र साजरी करण्यात येणार आहे. तसेच सी.पी.आय. (माओवादी) या नक्षल संघटनेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा माओवाद्यांतर्फे माहे फेब्रुवारी ते जुन 2026 या कालावधी दरम्यान टि. सी. ओ. सी. राबविण्यात येणार आहे. या टि. सी. ओ. सी. दरम्यानच्या कालावधीत माओवाद्यांद्वारे हिंसक घटना, शासकीय कार्यालय, बांबू / बिट डेपो, दुरध्वनी टॉवर्स इत्यादीची जाळपोळ, आयईडी, क्लोमोर, माईन्स प्लँट करणे, भुसंरुग स्फोट घडवून आणने, सुरक्षा दले पोलीस पथक तसेच पोलीस स्टेशन वर हल्ले घडवून आनण्याचा प्रयत्न करणे, रस्त्यांवर अडथळे निर्माण करुन रहदारी बंद करणे त्याचप्रमाणे ॲक्शन टिम द्वारे महत्वाचे राजकीय व्यक्ती, पोलीस अधिकारी /अमलदार व इतर शासकिय अधिकारी तसेच पोलीसांना मदत देणारे बातमिदार यांना लक्ष करणे इत्यादी हिंसक कारवाया करण्याच्या प्रयत्न करु शकतात. त्याचप्रमाणे रेल्वे संपतीस सुध्दा धोका पोहोचविण्याची तसेच काही विविध राजकीय पक्ष, संघटना व इतर नागरिक हे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी धरणे, मोर्चे, आंदोलने, सभा, मिरवणुक, सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्याची शक्यता असल्याने सदर कालावधीत कोणताही अनुचीत प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात दिनांक 22 मार्च 2026 चे 00.01 वा. ते दिनांक 05 एप्रिल 2026 चे 24.00 वाजे पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) लागू होणेस विनंती केलेली आहे. त्याअधी, सदर कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने विवक्षित कृतींना मनाई करणे व अव्यवस्थेला प्रतिबंध उपाय करणे आवश्यक आहे. करीता जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली, अविश्यांत पंडा, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) आणि (३) अन्वये प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील गोष्टींना मनाई करीत आहे. शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या किंवा लाठया किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी इतर कोणतीही वस्तु बरोबर नेणे, कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्र सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, किंवा जमा करणे किंवा तयार करणे यावर प्रतिबंध घालण्यात आले आहे. व्यक्तिच्या किंवा प्रेताच्या किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणने, वाद्य वाजविणे, ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धक्का पोहचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल, अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे, अगर सोंग आणणे आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे त्याचे प्रदर्शन करणे किंवा त्याचा जनतेत प्रसार करणे. उपविभागीय दंडाधिकारी, कार्यकारी दंडाधिकारी अथवा संबंधित पोलिस स्टेशन अधिकारी (जे शक्य असेल ते) यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणीही मिरवणूक काढू नये, पाच इसम किंवा त्यापेक्षा जास्त इसम सार्वजनिक जागेत सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक चावडीवर दिनांक 22 मार्च 2026 चे 00.01 वा. ते दिनांक 05 एप्रिल 2026 चे 24.00 वा.पर्यंत जमा होणार नाहीत किंवा कोणतेही कार्यक्रम आयोजित करणार नाही. सदर आदेश दिनांक 22 मार्च 2026 चे 00.01 वा. ते दिनांक 05 एप्रिल 2026 चे 24.00 वा.वाजेपावेतो संपुर्ण गडचिरोली जिल्हयाच्या क्षेत्राकरीता लागु राहतील असे जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली, अविश्यांत पंडा यांनी आदेशीत केले आहे.

## सिरोंचा तालुक्यातील टेकडा (टेकडा ताला) येथे बस सेवा सुरू!

विदर्भ केसरी । सिरोंचा



तालुक्यातील दुर्गम भाग असलेल्या टेकडा (टेकडा ताला) येथे अखेर एस.टी. बस सेवा सुरू करण्यात आली असून, प्रत्यक्ष बस गावात दाखल झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. ही बस सेवा सुरू होण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. या उपक्रमामागे सचिन मोतकूलवार (भाकप, गडचिरोली जिल्हा सचिव) यांच्या मार्गदर्शनाखाली रवि बारसागंडी (सिरोंचा तालुका सचिव) यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. तसेच यावेडी आंनदराव अशा, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता सतीश आरे यांनीही या मागणीसाठी पाठिंबा देत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. टेकडा परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी व कामगारांना दळणवळणाच्या सुविधांचा अभाव असल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. अखेर एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सकारात्मक निर्णय घेत टेकडा येथे नियमित बस सेवा सुरू केली. यामध्ये एस.टी. महामंडळाचे अधिकारी — चंद्रभूषण घागरगुंडे (आगार व्यवस्थापक साहेब), जितेंद्र चंपालाल राज वैद्य (बस स्थानक प्रमुख), सूर्यकांत भगवान मोरे (वाहतूक नियंत्रण), धुरबेश मेश्राम (वाहतूक नियंत्रण, सिरोंचा) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. बस गावात दाखल होताच ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत स्वागत केले. या निर्णयामुळे शिक्षण, आरोग्य व रोजगारासाठी ये-जा करणे आता अधिक सोपे होणार आहे. बस सेवा सुरू झाल्याबद्दल ग्रामस्थांनी भारतीय कम्युनिस्ट पक्ष तसेच विशेषतः रवि बारसागंडी, सचिन मोतकूलवार, यावेडी आंनदराव अशा आणि सतीश आरे यांचे आभार मानले असून, ही सेवा कायमस्वरूपी व नियमित ठेवण्याची मागणीही केली आहे.

## स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी पीसीपीएनडीटीकायद्याची अंमलबजावणी गरजेची

### जिल्हा महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली येथे एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न..

विदर्भ केसरी । गडचिरोली

स्त्री-भ्रूण हत्या रोखणे, जनजागृती वाढविणे व संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने जिल्हा महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली येथे गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी) कायद्याविषयी एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडली. या कार्यशाळेमध्ये स्त्री भ्रूण हत्या प्रतिबंध, लिंग गुणोत्तराचे सामाजिक महत्त्व, पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतुदी व त्याची अंमलबजावणी यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गर्भपात (वैद्यकीय समाप्ती) कायदा, सहाय्यित प्रजनन तंत्रज्ञान कायदा आणि सरोगसी (प्रतिनिधी मातृत्व) कायदा याबाबतही उपस्थितांना सखोल माहिती देण्यात आली. संबंधित कायद्यांचे उल्लंघन झाल्यास होणाऱ्या दंडात्मक कारवाईबाबतही स्पष्ट मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. ए.पी. खानोरकर (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली), डॉ. संतोष कोकुडे (अति. जिल्हा आरोग्य अधिकारी) तसेच सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सविता गोविंदवार उपस्थित होत्या. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी पीसीपीएनडीटी कायद्याचे सामाजिक व कायदेशीर महत्त्व अधोरेखित करत स्त्री भ्रूण हत्या ही गंभीर सामाजिक समस्या




असून तिच्या निर्मूलनासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा लहाडे यांनी गर्भपात (वैद्यकीय समाप्ती) कायदा, सहाय्यित प्रजनन तंत्रज्ञान कायदा व सरोगसी कायदा संदर्भात सविस्तर माहिती देत वैद्यकीय अधिकारी व संबंधित संस्थांनी कायद्याचे काटेकोर पालन करताना घ्यावयाच्या बाबी स्पष्ट केल्या. कार्यशाळेत डॉ. छाया उईके (अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक), डॉ. प्रशांत पेंदाम (बालरोगतज्ञ), डॉ. नीलकंठ मसराम (नोडल अधिकारी पीसीपीएनडीटी तसेच क्ष-किरण तज्ञ), डॉ. प्रशांत आखाडे (स्त्रीरोग तज्ञ), ॲड. तृप्ती राऊत (विधी सल्लागार), श्रीमती प्रतिज्ञा रामटेके (सार्वजनिक आरोग्य परिचारिका) यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी, आशा स्वयंसेविका, सामाजिक कार्यकर्ते, जिल्हा सल्लागार समिती सदस्य तसेच खाजगी सोनोग्राफी केंद्र चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेदरम्यान पीसीपीएनडीटी कायद्याच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचे मुद्दे, नोंदवही व नोंदणी प्रक्रिया, तपासणीदरम्यान घ्यावयाची खबरदारी तसेच गैरप्रकार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे वैद्यकीय व्यावसायिकांमध्ये कायद्याबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी पीसीपीएनडीटी कायद्याची शपथ घेत स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी तसेच लिंग समतोल राखण्यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प केला.

## "वर्ल्ड स्पॅरो डे" निमित्त चिमण्यांचे महत्त्व पटवून देत जनजागृती कार्यक्रम..

विदर्भ केसरी । गडचिरोली

लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडतर्फे जागतिक चिमणी दिनानिमित्त हेडरी येथील लॉयड्स राज विद्यानिकेतन शाळेत विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना चिमण्यांचे पर्यावरणातील महत्त्व आणि त्यांच्या संवर्धनाची गरज याबाबत जागरूक करणे हा होता. सदर कार्यक्रम सुरजगड आयर्न ओर खाण प्रकल्पाच्या पर्यावरण विभागामार्फत राबविण्यात आला. यावेळी आयोजित संवादात्मक सत्रात विद्यार्थ्यांना चिमण्यांची पर्यावरणातील भूमिका सविस्तरपणे समजावून सांगण्यात आली. चिमण्या या कीटक नियंत्रण, बियांचे प्रसारण तसेच पर्यावरणाच्या आरोग्याचे निदर्शक म्हणून अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना चिमण्यांची घटती संख्या ही शहरीकरण, अधिवास नष्ट होणे, कीटकनाशकांचा वाढता वापर आणि प्रदूषण यांसारख्या कारणांमुळे होत असल्याची माहिती देण्यात आली. तसेच या समस्यांचा गडचिरोली जिल्ह्याच्या स्थानिक संदर्भातही आढावा घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना चिमण्यांच्या संवर्धनासाठी सोपे व प्रभावी उपाय सुचविण्यात आले. पक्ष्यांसाठी पाणी व अन्न उपलब्ध करून देणे, घरटी बसविण्यासाठी बॉक्स तयार करणे नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे यांसारख्या उपक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.



Selected

# सोयाबीन वाढीसाठी नव्या शिफारसी!

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाद्वारे प्रसारित वरील नवीन सोयाबीन वाण हे बियाणे साखळीमध्ये असून विविध बिजोत्पादन संस्था जसे की महाबीज, विद्यापीठ, शेतकरी उत्पादक संघटना/कंपनी/गट, निजी संस्था इ. यांच्याकडे विविध दर्जाचे बियाणे उपलब्ध आहे.



## महत्वाच्या शिफारसी

- प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावतीद्वारे सोयाबीनच्या उत्पादन वाढीसाठी शेतकरी बंधुंसाठी एकुण २६ शिफारसी प्रसारित केल्या आहेत. यापैकी काही महत्वाच्या शिफारसी.
- सोयाबीन पिकामध्ये अधिक उत्पादन, आर्थिक मिळकत व मुलस्थानी जलसंधारणासाठी पेरणीनंतर अंदाजे ३० दिवसांनी सोयाबीनच्या ३ ओळीनंतर सरी काढावी.
- सोयाबीन पिकाला पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी कुटाराचे आच्छादन ५ टन प्रति हेक्टरी व पोटॅशियम नायट्रेट १% किंवा मॅग्नेशीयम कार्बोनेट ५% किंवा ग्लिसेरोल ५% या बाष्परोधाकाची फवारणी पिक फुलोऱ्यानंतर १५ दिवसांनी करावी.
- सोयाबीन पिकाची अवास्तव कायिक वाढ रोखण्यासाठी तसेच अधिक मिळकतीसाठी वाढ रोधक संजीवके क्लोरोमीक्वाट क्लोराईड १००० पीपीएम (२ मिली प्रती लिटर प्रमाणे) पाण्यात मिसळुन पेरणीनंतर ३०-४० दिवसांनी फवारणी करावी.
- सोयाबीन पिकांचे अधिक उत्पादन व मिळकतीसाठी शिफारशीत खताची मात्रा व २ टक्के युरियाची फवारणी (२ किलो युरीया १०० लिटर पाण्यात), पेरणीनंतर ५० ते ७० दिवसांनी करावी किंवा शिफारशीत खतांची मात्रा आणि शेंगा धरण्याच्या अवस्थेत २ टक्के डीएपी ची फवारणी करावी किंवा २ टक्के १९:१९:१९ (नत्र, स्फुरद व पालाश) विद्राव्य खताची फवारणी करावी.
- सोयाबीन पिकामध्ये जास्त उत्पादन मिळविण्यासाठी, नायट्रोवेन्झिन २०% ५०० पीपीएम (२.५ मिली/लिटर पाणी) फुलांच्या सुरुवातीच्या टप्प्यावर फवारण्याची शिफारस केली जाते.
- सोयाबीन पिकाचे जास्त उत्पादन व आर्थिक उत्पन्नासाठी सोयाबीनची पेरणी ४५ X १० से. मी. अंतरावर करावी.
- विदर्भातील मध्यम खोल काळ्या जमिनीत सोयाबीनच्या पीडीकेव्ही येलो गोल्ड, सुवर्णसोया व पीडीकेव्ही अंबा या वाणापासून अधिक उत्पादन व आर्थिक फायद्यासाठी ६२.५ किलो बियाणे प्रती हेक्टरी (कमीतकमी ७० टक्के उगवणशक्तीचे) पेरणी करिता वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.
- शेंगावरील करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी पेरणीनंतर ५५ आणि ७५ दिवसांनी कार्बोक्झिन थायरम (३ ग्रॅम/किलो) किंवा कार्बेन्डाझिम+मॅन्कोझेब (२ ग्रॅम/किलो) आणि त्यानंतर ५५ आणि ७५ दिवसांनी थायोफेनेट मिथाइल ०.१% च्या दोन फवारण्या करण्याची शिफारस केली जाते.
- सोयाबीनच्या मुळकुज/खोडकुज कॉम्प्लेक्स आणि खोडमाशीच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोविन+पेनफ्लुफेन १ ग्रॅम/किलो बियाणे किंवा थायोफेनेट मिथाइल+पायरोक्लोस्ट्रोविन २ मिली/किलो बियाणे या सोबतच थायमिथोक्झाम ६०० एफएस २ मिली/किलो बियाण्याची बीजप्रक्रिया करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



# काय आहे कृषी समृद्धी योजना; शेतकऱ्यांना काय फायदे?

महाराष्ट्र सरकारने कृषी समृद्धी योजना जाहीर केली; 5,000 कोटींची गुंतवणूक.) योजना शाश्वत शेती, पाणी व्यवस्थापन, मृदा आरोग्य, हवामान अनुकूल शेतीवर लक्ष केंद्रित करणार ३) शेतमाल प्रक्रियेसाठी मूल्य साखळी विकास व पायाभूत सुविधा निर्माण केली जाणार. ) उत्पादन खर्च कमी करून, शेतीचे उत्पन्न वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. M५) नैसर्गिक शेतीसाठी स्वतंत्र अनुदान देण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे PUNE NEWS: महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आज (ता.२२) कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पत्रकार परिषद घेतली. या परिषदेत त्यांनी शेतकऱ्यांसाठी कृषी समृद्धी योजना जाहीर केली. या योजनेसाठी आवश्यक असणारा शासकीय आदेश (जीआर) आजच जारी करण्यात आला आहे.या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतात तब्बल ५ हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक केली जाणार आहे, ज्याला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता आहे. योजनेत पाणी व्यवस्थापन, मृदा आरोग्य, हवामान अनुकूल शेती आणि मूल्य साखळी विकास यासारख्या घटकांवर भर दिला जाणार आहे. यासोबतच नैसर्गिक शेतीसाठीही स्वतंत्र अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दोन्ही योजनांमुळे शेती अधिक शाश्वत आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणारी ठरणार आहे.ही योजना शेतकऱ्यांचे जीवनमान



उंचावण्यासाठी आणि शेतीला अधिक उत्पादक आणि शाश्वत बनवण्यासाठी अनेक महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करते. यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहेपाणी व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचन: शेतात पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा यासाठी सूक्ष्म सिंचन तंत्राचा वापर केला जाईल.मृदा आरोग्य व्यवस्थापन: जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या जाणार आहेत.हवामान अनुकूल पिक पद्धती: हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी बहुविध पिकांचा अवलंब केला जाईल.मूल्य साखळी विकास: शेतमालाला चांगला भाव मिळावा यासाठी बाजारपेठेशी जोडणी आणि प्रक्रिया सुविधा वाढवल्या जाणार आहेत. काढणी पश्चात पायाभूत सुविधा: शेतमाल साठवणूक आणि वाहतुकीसाठी आधुनिक सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत उपजीविका विविधीकरण: शेतकऱ्यांना शेतीबरोबरच इतर उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. संस्थात्मक बळकटीकरण आणि क्षमता वृद्धी: शेतकऱ्यांना प्रशिक्षण आणि नवीन तंत्रज्ञानाची माहिती दिली जाईल प्रायोगिक प्रात्यक्षिके आणि संशोधन: शेतीतील नावीन्यपूर्ण प्रयोग आणि संशोधनाला प्रोत्साहन दिले जाईल कृषी समृद्धी योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेतीला अधिक शाश्वत बनवणे हा आहे. यासाठी खालील बाबींवर भर दिला जाणार आहे: १) पायाभूत सुविधा निर्माण करणे: शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवणे.२) उत्पादन खर्च कमी करणे: शेतकऱ्यांचा खर्च कमी करून त्यांचा नफा वाढवणे.३) जमिनीची आणि पिकाची उत्पादकता वाढवणे: आधुनिक तंत्रज्ञान आणि पद्धतींचा वापर करून उत्पादन वाढवणे. ४) पिकांमध्ये विविधता आणणे: एकाच पिकावर अवलंबून न राहता विविध पिकांचा अवलंब करणे. ५) मूल्य साखळी बळकट करणे: शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळावी यासाठी साखळी मजबूत करणे. ६) हवामान अनुकूल शेतीला प्रोत्साहन: हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देणे.केंद्र सरकार रासायनिक खतांसाठी दरवर्षी १ लाख ९० हजार कोटी रुपयांचे अनुदान देते, आणि यात दरवर्षी वाढ होत आहे. मात्र, रासायनिक खतांचा वापर वाढत असल्याने पर्यावरण आणि जमिनीच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. यामुळे राज्य सरकारने आता नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुदानात नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींचा समावेश असेल, जसे की सेंद्रिय खते, बायो-इनपुट्स आणि इतर संसाधने. या योजनेला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली आहे. कृषी समृद्धी योजना आणि नैसर्गिक शेतीसाठी अनुदान या दोन्ही योजनांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्याची अपेक्षा आहे. शेतीला अधिक उत्पादक, शाश्वत आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी या योजना महत्त्वपूर्ण ठरतील. शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि बाजारपेठेशी जोडणीच्या माध्यमातून त्यांचे उत्पन्न वाढवण्याची संधी मिळेल.१) कृषी समृद्धी योजनाम्हणजे काय? ी ोजना शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि शेती शाश्वत बनवण्यासाठी राबवली जाणार आहे. २) या योजनेत किती गुंतवणूक होणार आहे?राज्य सरकार ५,००० कोटी रुपये भांडवली गुंतवणूक करणार आहे.३) नैसर्गिक शेतीसाठी काय मदत मिळणार आहेनैसर्गिक शेतीसाठी स्वतंत्र अनुदान, सेंद्रिय खते आणि बायो-इनपुट्ससाठी मदत दिली जाणार आहे.४) शेतकऱ्यांना या योजनेत कोणते लाभ मिळणारआधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण, सिंचन सुविधा, बाजारपेठेसह उत्पादन खर्च कमी करणे.५) या योजनेमुळे पर्यावरणाला फायदा होईल का?

यशोगाथा

# कापूस उत्पादकांना खुशखबर!

राज्य सरकार कापसाला योग्य भाव मिळाला नाही म्हणून हेक्टरी पाच हजार रुपयांची मदत जास्तीत जास्त दोन हेक्टरपर्यंत देईल, या निर्णयाची अंमलबजावणी लवकरच केली जाईल, असे पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी बुधवारी विधानसभेत सांगितले, सोयाबीन उत्पादकांनाही मदत जाहीर केली जाईल, असे ते म्हणाले.कापूस हे विदर्भ व मराठवाड्यातील प्रमुख पीक आहे. कापूस पिकाला येणारा एकरी उत्पादन खर्च व मिळणारे उत्पन्न याबाबत तफावत असल्याचे दिसून येत आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना येणारा खर्च व मिळणारे उत्पन्न यातील तफावत कमी करून शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण ठरविण्यात येईल, अशी माहिती पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.कापसाच्या दराबाबत सदस्य हरीश पिंपळे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत विरोधी पक्ष नेता विजय वडेट्टीवार, सदस्य प्रकाश सोळंके, यशोमती ठाकूर, नारायण कुचे, राजेश एकडे, बाळासाहेब पाटील, हरिभाऊ बागडे, दीपक चव्हाण, राजेश पवार यांनी उपप्रश्न उपस्थित केले. मंत्री श्री. सत्तार म्हणाले, मागील हंगामात मध्यम धाग्याच्या कापसाला प्रती क्विंटल ६ हजार ६२० रुपये व लांब धाग्याच्या कापसाला ७ हजार २० रूपये प्रतिक्विंटल कापसाला दर दिला होता. सन २०२४-२५ मध्ये मध्यम धाग्याची कापूस खरेदी ७ हजार १२५ आणि लांब धाग्याचा कापसाची खरेदी प्रतिक्विंटल ७ हजार ५२१ ने



करण्यात येणार आहे. सोयाबीनचे दर कमी असल्यामुळे संकटात सापडलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनाही मदत करण्यात येईल. कापूस पिकाला नुकसान भरपाईसाठी शासन हेक्टरी पाच हजार रुपयेप्रमाणे दोन हेक्टर मर्यादित देणार असून, याबाबतची कार्यवाही लवकरच सुरू करण्यात येत आहे. मंत्री श्री. सत्तार म्हणाले की, राज्यात मागील हंगामात ११० केंद्रामार्फत सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) १२ लाख क्विंटल, खासगी बाजारात ३ लाख १६ हजार ९५ क्विंटल कापूस खरेदी करण्यात आला आहे. स्वामिनाथन समितीने केलेल्या शिफारशीनुसार कापसाला भाववाढ मिळण्यासाठी केंद्राकडे मागणी केली आहे. सीसीआय कापूस खरेदीसाठी ई-पीक पाहणीमध्ये कापूस लागवडीची नोंद नसल्यामुळे अडचण निर्माण होते. याबाबत गावपातळीवर कृषी सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांची समिती स्थापन करण्यात आली असून ई-पीक पाहणीमध्ये नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी समिती करणार आहे. त्यामुळे सीसीआयच्या कापूस खरेदीला अडचण येणार नाही. राज्यात बी ७, बी ८ कापूस बियाणे उपलब्धतेबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. तेलंगणा राज्यात कापूस पिकासाठी देण्यात येत असलेल्या अनुदान योजनेबाबत सर्वंकष माहिती घेण्यात येईल. कापूस खरेदीसाठी या हंगामात सीसीआयची खरेदी केंद्र वेळेत सुरू होण्यासाठी दक्षता घेण्यात येईल.


# एफसीआयने केली २६६ लाख मेट्रिक टन गहू खरेदी

भारतीय अन्न महामंडळाने (एफसीआय) चालू रब्बी विपणन हंगाम (आरएमएस) २०२४-२५ मध्ये, गेल्या वर्षीच्या हंगामातील २६२ लाख मेट्रिक टन (एलएमटी) चा आकडा मागे टाकत, २६६ लाख मेट्रिक टन गव्हाची यशस्वीपणे खरेदी केली.भारतीय अन्न महामंडळाने (एफसीआय) चालू रब्बी विपणन हंगाम (आरएमएस) २०२४-२५ मध्ये, गेल्या वर्षीच्या हंगामातील २६२ लाख मेट्रिक टन (एलएमटी) चा आकडा मागे टाकत, २६६ लाख मेट्रिक टन गव्हाची यशस्वीपणे खरेदी केली असून, देशाला अन्नधान्याच्या बाबतीत पुरेसे सुरक्षित केले आहे. आरएमएस २०२४-२५ दरम्यान २२ लाखांहून अधिक भारतीय शेतकऱ्यांना सरकारने केलेल्या गहू खरेदीचा लाभ मिळाला आहे. किमान आधारभूत किंमतीला (एमएसपी) झालेल्या गहू खरेदीमुळे या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सुमारे ६१ लाख कोटी रुपये थेट जमा झाले आहेत. मोठ्या प्रमाणातील गहू खरेदीमुळे एफसीआय ला सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये अन्नधान्याचा स्थिर ओघ सुनिश्चित करण्यामध्ये मदत झाली आहे. पीएमजीकेएवाय सह विविध कल्याणकारी योजनांतर्गत अंदाजे १८४ एलएमटी गव्हाची वार्षिक गरज पूर्ण करण्यासाठी ही संपूर्ण खरेदी प्रक्रिया महत्वाची ठरली आहे भारत सरकारने आरएमएस २०२४-२५ साठी गव्हाची किमान आधारभूत किंमत प्रति क्विंटल रु. २,२७५ इतकी घोषित केली होती. गव्हाव्यतिरिक्त, खरीप विपणन हंगाम २०२३-२४ दरम्यान, केंद्रीय साठ्यासाठीची धान खरेदी ७७५ एलएमटी पेक्षा जास्त झाली.

# नका होऊ देऊ दुर्लक्ष : पावसाळ्यात विविध आजारांचे असते पशुधनावर लक्ष


राज्यात पाऊसाने सर्वत्र हजेरी लावायला सुरुवात केली आहे. अशा परिस्थितीत पावसाळ्याच्या दृष्टीने पशुपालकांनी आपल्या जनावरांची योग्य ती काळजी घेणं गरजेचं असतं. अन्यथा जनावरे आजारी पडतात. परिणामी शेतकरी बांधवांना आर्थिक हानीस सामोरे जावे लागते. जनावरांना जंतूसंसर्ग किंवा योग्य पोषणाअभावी होणारे विविध आजार वेळीच ओळखून त्यावर उपाय करणे गरजेचे आहे. पावसाळ्यात प्रामुख्याने गायींना घटसर्प, फऱ्या, पोटकृमी, विषबाधा, तिवा, अपचन अशा प्रकारच्या विविध आजारांना सामोरं जावं लागते. तसेच शेळी, मेंढींना फुटरॉट, आंत्रविषार, विषबाधा, हिमरेझीक सेप्टिसेमियाजंत प्रार्दुभाव यासारखे आजार होतात.





## घटसर्प


या आजारामध्ये जनावरांना अधिक प्रमाणात ताप येतो. श्वास घेण्यास त्रास होवून घशा भोवती सूज येवून जनावरे मृत्युमुखी देखील पडतात. जनावरांच्या शरीरामध्ये घटसर्पाचे जंतू असतात, परंतू वातावरणात झालेला बदल व उन्हाळ्यात पौष्टिक चारा न मिळाल्यामुळं शरीरावर ताण येऊन त्यांची प्रतिकारशक्ती कमी होते. त्यामुळं या आजाराचा मोठ्या प्रमाणात संसर्ग होतो. जनावरांना आजार होऊ नये यासाठी पावसाळ्यापूर्वी हिमरेझीक सेप्टिसेमिया या घटसर्प प्रतिबंधक लसीची मात्रा दिल्यास या आजारापासून जनावरांचे रक्षण होते.



## फऱ्या

या आजारात जनावरांना ताप येतो व एक किंवा दोन्ही पायांना सूज येऊन जनावरे लंगडतात. कमी वयाची जनावरे या रोगास जास्त बळी पडतात. त्यामुळं जनावरांचे वेळीच लसीकरण करणं करणं आवश्यक आहे. यासाठी प्रामुख्यानं दोन वर्षाच्या आतील वासरांचे शंभर टक्के लसीकरण करुन घेणं आवश्यक आहे





## फुटरॉट

शेळी व मेंढीमध्ये पावसाळ्यात चिखल व पाण्यामुळं खुरामध्ये जंतुची वाढ होऊन पायांना व खुरांना सूज येते तसेच तापही येतो. शेळ्या चालतांना लंगडतात. खुरांची स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे. यासाठी पोटाशिअम परमॅंगनेटच्या द्रावणामध्ये खुरे बुडवून स्वच्छ धुतल्यास हा आजार आटोक्यात येते.



## पोटफुगी

पावसाळ्यात हिरवा चारा उपलब्ध होतो. परंतू अचानक चाऱ्यांमध्ये बदल केल्यास तर पोटफुगी होऊन जनावरे दगावतात. चाऱ्यात बदल करताना थोड्या थोड्या प्रमाणात पूर्वीचा व नवीन चारा एकत्र करुन खाण्यासाठी द्यावा. हिरवा चाऱ्यांबरोबरच वाळलेला चाराही देण्यात यावा.



## प्रादुर्भाव

पावसाळ्यात विविध प्रकारचे जंत पाण्यात मिसळल्यामुळं पाणी दूषित होतं. असे दूषित पाणी पिल्यामुळं लिव्हर फ्ल्यूक, गोलकृमी, पट्टकृमी या जंताचे शरीरात प्रमाण वाढून प्राणी दगावतात.त्यामुळं त्यांची संख्या नियंत्रणात आणणं गरजेचे आहे.



## आंत्रविषार

शेळी व मेंढी मध्ये ह्या आजारांची मोठ्या प्रमाणात लागण होते. जास्त प्रमाणात कोवळे गवत खाल्यास अपचन होते. यावेळी शेळ्या आजारी पडून चालतांना अडखळतात. तोल जावून श्वास घेण्यास त्रास होतो. पोट फुगी किंवा जुलाब होवून जनावरे दगावतात. पावसाळ्यापूर्वी लसीकरण केल्यास आजार नियंत्रणात येतो. जनावरांना योग्य प्रमाणात चारा खाण्यास द्यावा. शेळी व मेंढ्यांना एंटरोटोक्झेमिया (ईटी) लस 14 दिवसाच्या अंतराने दोन वेळेस देण्यात यावी.